वर्ष-०९ | अंक-२५ | मुंबई, मंगळवार ०९ ते १५ मे - २०२३ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
POSTAL REGISTRATION
No.PLG/205/2022-2024

मूल्य २/- रुपये

# पोलीस बातमी पत्र

# POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 तुमच्या यकृताची काळजी घेण्यासाठी जीवनशैलीत करा हे बदल

3 → युक्रेनच्या क्रेमलिन ड्रोन हल्ल्यामुळे रशियाकडुन युक्रेनसह विश्वाची महाविणाशाकडे वाटचाल?

गुंतवणूकदारांना 2.77 कोटींचा गंडा, मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेकडून स्टॉक ब्रोकरला बेड्या ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

## बोरिवली पोलिसांनी सीसीटीव्ही वरून केली दोन आरोपींना अटक

**90 हजार रुपये आणि साडेचार लाखांचे दागिने केले होते लंपास**



मुंबई : मुंबईच्या विविध भागात मागील काही दिवसांपासून चोरीच्या घटना वारंवार घडू लागल्या आहेत. बोरिवली पश्चिम परिसरात राहणाऱ्या एका जोडप्याच्या घरात चोरी झाल्याबाबतची तक्रार बोरिवली पोलीस ठाण्यात दिली. घरातील तिजोरीतून रोख रक्कम एक लाख 90 हजार रुपये आणि साडेचार लाखांचे दागिने चोरी गेल्याची ही तक्रार होती. या तक्रारीनुसार गुन्हा दाखल झाल्यानंतर एपीआय तडवी, एएसआय सावंत, कॉन्स्टेबल रबिल शेख, योगेश कदम, विक्रांत मेहेर, चंद्रकांत जगताप, प्रवीण तड्डे, लेहंगे यांच्या पथकाने चोरीच्या घटनेच्या ...पान २ वर...

# 85 वर्षीय वृद्धाची केअरटेकरने केली हत्या, सांताक्रूज परिसरात खळबळ

मुंबईच्या सांताक्रुझ भागामध्ये एका 85 वर्षा च्या वृद्ध माणसाची त्याच्या घरात काम करणाऱ्या केअर टेकरने हत्या केल्याची घटना घडली आहे. या हत्येनंतर मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणानंतर महानगरांमध्ये एकट्या राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. मुरलीधर पुरुषोत्तम नाईक यांचे हात व पाय बांधून तोंडात रुमाल टाकून गळा आवळून त्यांची हत्या करण्यात आली आहे. चोरीच्या उद्देशाने ही हत्या झाली असावी असा पोलिसांचा संशय आहे.




**मुरलीधर पुरुषोत्तम नाईक यांचे हात व पाय बांधून तोंडात रुमाल टाकून गळा आवळून त्यांची हत्या करण्यात आली आहे. चोरीच्या उद्देशाने ही हत्या झाली असावी असा पोलिसांचा संशय आहे.**

मुरलीधर पुरुषोत्तम नाईक 85 वर्ष हे त्यांच्या पत्नी उमा नाईक यांच्यासोबत इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर गेल्या अनेक वर्षा पासून राहत होते. पती-पत्नी दोघेही व्यवसायाने डॉक्टर होते. मुरलीधर यांना दोन मुले आणि एक मुली असून ते मुंबईच्या विलेपार्ले, चेंबूर आणि नवी मुंबई भागामध्ये राहतात. वृद्ध दामापत्य हे ...पान २ वर...

## महिलेने दोन तरुणांना प्रेमाच्या जाळ्यात ओढले, पुढे झाले असे की...




नागपूर: पतीपासून विभक्त राहणाऱ्या महिलेने दोन तरुणांना प्रेमाच्या जाळ्यात ओढले. दोघांनीही तिच्यासाठी मोठमोठ्या भेटवस्तू, हॉटेलमध्ये खर्च आणि महागड्या कपड्यांपासून ते भ्रमणध्वनीपर्यंत खर्च केला. शेवटी ती पहिल्या प्रियकराच्या बाहुपाशात दुसऱ्या प्रियकराला दिसली. त्यामुळे दोघांमध्ये तुफान हाणामारी झाली. एकाने दुसऱ्यावर चाकू हल्ला करीत जीवे मारण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी कपिलनगर पोलिसांनी एकाविरुद्ध गुन्हा दाखल केला. बजरंगी (२८, रा. म्हाडा कॉलनी) असे जखमी युवकाचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ३० वर्षीय महिला मोनाली (काल्पनिक नाव) ही दोन मुलींसह कपीलनगरात राहते. तिला ऐशोआरामत जगायची सवय आहे....पान २ वर...

## धक्कादायक! राज्यात रोज सरासरी 70 तरुणी होतायत बेपत्ता, मार्च महिन्यात 2200 मुली गायब

राज्यातील 18 ते 25 वयोगटातील तरुणी बेपत्ता (Missing) होण्याचे प्रमाण वाढले असून, याबाबत धक्कादायक आकडेवारी समोर आली आहे. कारण मार्च महिन्यात तब्बल 2200 मुली बेपत्ता झाल्या असल्याची नोंद करण्यात आली आहे. म्हणजेच रोज सरासरी 70 मुली बेपत्ता होत




असल्याची धक्कादायक आकडेवारी समोर येत आहे. विशेष म्हणजे बेपत्ता तरुणींमध्ये सर्वाधिक 18 ते 20 या वयोगटातील मुलींचा समावेश आहे. तर जानेवारी महिन्यात 1600 आणि फेब्रुवारी महिन्यात 1810 मुली बेपत्ता झाल्या असल्याची नोंद झाली आहे. बेपत्ता झालेली ...पान २ वर...

## पालकांनो, अल्पवयीन मुलींकडे लक्ष द्या! बीड जिल्ह्यात पाच दिवसाला एक मुलगी गायब

राज्यात तरुणी बेपत्ता होण्याचे प्रमाण वाढले असल्याची आकडेवारी समोर आली असतानाच, बीड जिल्ह्यात देखील पाच दिवसाला एक मुलगी गायब होत असल्याचे समोर आले आहे. तर अल्पवयीन मुलीच नव्हे तर विवाहित महिला, लेकरांची आई देखील बेपत्ता होत असल्याचे




आकडेवारीतून समोर आले आहे. बीड जिल्ह्यात मागील दोन महिन्यात 18 वर्षा वरील 30 पेक्षा अधिक महिला, मुली बेपत्ता झाल्या आहेत. त्यामुळे त्यांचा शोध पोलिसांकडून घेतल जात आहे. 'लोकमत'ने याबाबत वृत्त दिले आहे. मागील वर्षभरापासून प्रेमसंबंधातून ...पान २ वर...

**मुंबईकरांनो, सावधान!**

# लाइक अन् सबस्क्राइब करेल खातं रिकामं फसवणुकीच्या घटना वाढल्यात

मुंबई : समाजमाध्यमांवर एखादी रील समोर येते किंवा युट्यूबवर एखादा व्हिडीओ येतो. सोबत लाइक, सबस्क्राइब असे संदेश येतात. आपण नकळत लाइक करतो, रील करणाऱ्याला एखादा स्टार देतो. सायबरचोरांनीही आता हेच आपल्या कमाईचे माध्यम बनविले आहे. केव्हाही, कुठेही मोबाइलमध्ये लाइक, सबस्क्राइब



करा आणि लाखो रुपये कमवा, असे भासवून सर्व सामान्य नागरिकांना हातोहात गंडविले जात आहे. सायबर पोलिसांकडे हीच गुन्हेपद्धत वापरून फसवणूक झाल्याच्या अनेक तक्रारी येत आहेत. अशी आहे घटना कांदिवली येथील एका ट्रेनरला तिच्या व्हॉट्सॲपवर अनोळखी क्रमांकावरून संदेश आला. यूट्यूबवरील व्हिडीओ लाइक केल्यास प्रत्येक लाइकचे १४० रुपये मिळतील, असे यात नमूद करण्यात आले होते. मोबाइल कायम हातात असल्याने कुठेही सहज लाइक करणे शक्य असल्याने महिला ट्रेनरने संदेशातील क्रमांकावर संपर्क केला. त्यानंतर समोरील महिलेने तिला लिंक पाठवल्या आणि त्यावर जाऊन लाइक करण्यास सांगितले. सुरुवातीला ...पान २ वर...

## 'मॅफेड्रॉन' अंमली पदार्थ विक्री करणा-या दोघांना अटक

मीरा भाईंदर (ठाणे): मीरा भाईंदर शहरात सध्या अंमली पदार्थ विक्रीची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे.शहरातील अनेक भागात तरुण-तरुणी अंमली पदार्थांच्या आहारी गेले आहेत. त्यामुळे पोलीस प्रशासनाने अंमली पदार्थ बाबत जनजागृती देखील करणे गरजेचे आहे; मात्र पोलीस किरकोळ कारवाई करून मॅफेड्रॉन (एम.डी.) जप्त करत असल्याचे दिसून येत आहे. शहरात हे अंमली पदार्थ येतात कुठून यांच्या मुळाशी जाणे महत्त्वाचे आहे; परंतु पोलीस हे किरकोळ विक्रेत्यांवर कारवाई करून दिखावा करत असल्याची चर्चा सुरू आहे.विक्रेत्यांवर




पोलिसांचा छापाः काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीतील रेतीबंदर, घोडबंदर येथे एका चाळीमध्ये मोठ्या प्रमाणात मॅफेड्रॉन (एम.डी.) या अंमली पदार्थांची विक्री केली जात असल्याची माहिती जयंत बजबळे, पोलीस उपआयुक्त, परिमंडळ १ मिरारोड यांना शनिवारी माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने त्यांनी त्या ठिकाणी पथकासह छापा टाकून कारवाई केली. त्यावेळी त्या ठिकाणी १०५ ग्रॅम वजनाचा ८ लाख ४० हजार रुपये किंमतीचा मॅफेड्रॉन (एम.डी.) हा अंमली पदार्थ विक्री करण्यासाठी ...पान २ वर...

## शरद पवार वारसदार निर्माण करण्यात अपयशी ठरले, त्यामुळे...., ठाकरे गटाचं मोठं विधान



राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या राजीनामानाट्यावर महाविकासआघाडीतील घटकपक्ष असलेल्या शिवसेना-ठाकरे गटाने मोठं विधान केलं आहे. "शरद पवार हे राष्ट्रीय पातळीवर मोठे नेते नक्कीच आहेत. त्यांच्या शब्दाला राष्ट्रीय राजकारणात मान असला, तरी पक्ष पुढे नेईल असा वारसदार निर्मा णकरण्यात ते अपयशी ठरले," असं मत ठाकरे गटाचं मुखपत्र असलेल्या सामनाच्या अग्रलेखात म्हटलं आहे. ठाकरे गटाने म्हटलं, "राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्षपद सोडत असल्याची घोषणा शरद पवार यांनी...पान २ वर...


## दिसायला चांगली नाही म्हणून पत्नीला बेदम मारहाण करून केली हत्या

नांदेड जिल्ह्यातील इस्लापुरच्या परोटी तांडा येथे एक संतापजनक प्रकार समोर आला असून, पत्नीला बेदम मारहाण करत तिचा खून करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. विवाहित तरुणीला तू दिसायला चांगली नाहीस, तुझ्या माहेराहून रुपये घेऊन ये, या कारणावरून पतीकडून मारहाण करताना 6 मे रोजी सकाळी




विवाहितेचा मृत्यू झाला असल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी इस्लापूर पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रेश्मा गोकुळ चव्हाण (वय 30 वर्षे) असे मयत महिलेच नाव असून, गोकुळ नामदेव चव्हाण (वय 35 वर्षे) असे आरोपी पतीचे नाव आहे. पोलिसात दाखल करण्यात आलेल्या तक्रारीनुसार, परोटी येथील रेश्मा चव्हाण तरुणीचे दहा वर्षांपूर्वी लग्न झाले होते आणि तिला दोन मुली, एक मुलगा आहे. दरम्यान ...पान २ वर...

## १४ वर्षांच्या मुलावर अनैसर्गिक अत्याचार करताना चित्रीकरण केले; चौघांविरोधात गुन्हा दाखल



मुंबईः गोरेगाव पूर्व येथे १४ वर्षांच्या मुलावर अनैसर्गिक अत्याचार केल्याप्रकरणी चौघांविरोधात दिंडोशी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे....पान २ वर...

# सत्तासंघर्षाचा निकाल येत्या तीन-चार दिवसांत? सत्ताधा-यांबरोबरच विरोधकांचीही धाकधूक वाढली

मुंबई : राज्य सरकारचा विश्वासदर्शक ठराव, विधानसभा अध्यक्षांच्या निवडीची वैधता आणि शिंदे गटातील आमदारांची अपात्रता याबाबत सर्वोच्च न्यायालयाचे पाच सदस्यीय घटनापीठ येत्या तीन-चार दिवसांत निर्णय देण्याची शक्यता आहे. त्यामुळे शिंदे-फडणवीस सरकारचे याच आठवड्यात निश्चित होण्याची शक्यता असल्यामुळे सत्ताधाऱ्यांबरोबरच विरोधी पक्षांची धाकधूकही वाढली आहे. राज्यघटनेच्या दहाव्या परिशिष्टातील तरतुदीनुसार दोनतृतीयांशहून अधिक आमदारांचा गट फुटल्यास त्यांना अन्य पक्षात विलीन होण्याचे बंधन आहे. शिंदे गट कोणत्याही पक्षात विलीन झालेला नाही, तर आपलाच गट हीच खरी शिवसेना असल्याचा दावा न्यायालयात केला आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने तोच मूळ पक्ष असल्याचे मान्य करून धनुष्यबाण हे निवडणूक चिन्हही बहाल केले. त्यामुळे ठाकरे गटाने बंडखोर आमदारांवर बजावलेल्या अपात्रतेच्या याचिकांचे भवितव्य न्यायालय ठरविणार की विधानसभा अध्यक्षांकडे सुनावणीसाठी पाठविले जाणार, हा मुद्दा कायदेशीर व राजकीय दृष्टीनेही महत्त्वाचा ठरणार आहे. सरन्यायाधीश डॉ. धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती एम. आर. शहा, न्यायमूर्ती कृष्ण मुरारी, न्यायमूर्ती हिमा कोहली आणि



न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा यांच्या पाच सदस्यीय घटनापीठापुढे सुनावणी पूर्ण झाल्यानंतर निकाल राखून ठेवण्यात आला आहे. न्यायमूर्ती शाह हे १५ मे रोजी निवृत्त होत असून तत्पूर्वी म्हणजे मंगळवार ते शुक्रवार या दरम्यान घटनापीठ निकाल देण्याची शक्यता वर्तविली जात आहे. शिंदे यांची विधिमंडळ गटनेतेपदावरून उद्धव ठाकरे यांनी केलेली हकालपट्टी आणि शिंदे यांनी या पदावर स्वतः ची केलेली नियुक्ती वैध आहे का, मुख्य प्रतोदपदी सुनील प्रभू की भरत गोगावले यांची नियुक्ती वैध, या मुद्द्यांवर घटनापीठ निर्णय देणार आहे. आतापर्यंत झालेल्या सुनावण्यांमध्ये अरुणाचल विधानसभा अध्यक्ष नबम रेबियाप्रकरणी प्रामुख्याने युक्तिवाद झाले. विधानसभा अध्यक्षांविरोधात अविश्वास प्रस्तावाची नोटीस देण्यात आली, तर त्यावर सभागृहात निर्णय होईपर्यंत त्यांना आमदार अपात्रतेच्या याचिकांवर निर्णय देता येणार नाही, असा पाच सदस्यीय घटनापीठाचा निकाल आहे. त्याचा फेरविचार करण्यासाठी सात सदस्यीय घटनापीठाकडे हे प्रकरण पाठवावे का, या मुद्द्याचा घटनापीठ विचार करणार आहे. विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांनी अपात्रतेच्या याचिकांवर संबंधित आमदारांना उत्तर सादर करण्याच्या नोटिसा बजावल्या आहेत. पण शिंदे ...पान २ वर...

# तुमच्या यकृताची काळजी घेण्यासाठी जीवनशैलीत करा हे बदल

निरोगी आरोग्यासाठी तुमच्या शरीराची काळजी घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे, विशेषतः तुमच्या यकृताची. यकृत तुमच्या शरीरातील महत्त्वाचा अवयव आहे, जो विषारी पदार्थ बाहेर टाकण्यासाठी आणि तुमचे संपूर्ण आरोग्य सुधारण्यासाठी जबाबदार असतो. पण चुकीचा आहार आणि जीवनशैलीतील चुकीच्या सवयींमुळे तुमचे यकृत खराब होत असते. परिणामी त्याचा आरोग्यावर अत्यंत वाईट परिणाम होतो. पण योग्य आहाराद्वारे आपण यकृत खराब होण्याचा धोका कमी करू शकतो. कॉन्शियस फूडमधील इन-हाउस न्यूट्रिशनिस्ट सलोनी झवेरी यांनी एचटी लाइफस्टाइलला दिलेल्या माहितीनुसार, "अनेक नैसर्गिक उपाय यकृताच्या कार्याला चालना देऊ शकतात."

मिल्क थिस्टल – मिल्क थिस्टल ही सिलीमारिन नावाचे फ्लेव्होनॉइड कॉम्प्लेक्स असलेली एक औषधी वनस्पती, त्यात अँटिऑक्सिडंट आणि दाहविरोधी गुणधर्म आहेत, जे यकृताचे संरक्षण करू शकतात.

हळद – हळद, कर्क्युमिनयुक्त मसाला यांमुळे विषारी पदार्थांमुळे होणारे यकृताचे नुकसान टळू शकते आणि यकृताचे कार्य वाढू शकते.

ग्रीन टी – ग्रीन टीमध्ये कॅटेचिन, संयुगे असतात ज्यांत दाहविरोधी आणि अँटिऑक्सिडंट गुणधर्म असतात आणि यकृताला विषारी पदार्थांमुळे होणाऱ्या नुकसानापासून वाचविण्यास मदत करतात.

लसूण – लसूण, ज्यामध्ये अॅलिसिन असते, त्यात अँटिऑक्सिडंट आणि दाहविरोधी गुणधर्म असतात जे यकृताला विषारी पदार्थांपासून वाचवतात आणि यकृताचे कार्य सुधारते.

बीट – बीट, ज्यामध्ये बीटेन असते. हे एक संयुग आहे जे यकृताला विषारी पदार्थांपासून वाचवू शकते आणि यकृताचे कार्य सुधारू शकते.

"या नैसर्गिक उपायांचा तुमच्या आहारात समावेश करण्यासोबतच, यकृताच्या कार्याला चालना देण्यासाठी निरोगी जीवनशैली राखणे महत्त्वाचे आहे. यामध्ये संतुलित आहार घेणे, नियमित व्यायाम करणे, धूम्रपान आणि मद्यपान टाळणे आणि तणावाची पातळी नियंत्रित करणे समाविष्ट आहे. तुम्हाला यकृताचा आजार असल्यास किंवा तुम्हाला यकृतात बिघाड झाल्याची शंका असल्यास, योग्य निदान आणि उपचारांसाठी वैद्यकीय सल्ला घेणे आवश्यक आहे," असेही डॉ. झवेरी यांनी या वेळी स्पष्ट केले.

याबाबत आत्मांतन वेलनेस सेंटरचे सीईओ आणि वैद्यकीय संचालक डॉ. मनोज कुटेरी सांगतात की, "यकृताची काळजी घेणे हा एखाद्या व्यक्तीच्या आरोग्याचा सर्वात महत्त्वाचा निर्धारक घटक आहे. बहुतेक डिटॉक्स प्रोग्राम यकृत साफ करण्यावर लक्ष केंद्रित करतात. यकृत हा आपल्या



शरीरातील महत्त्वाचा अवयव आहे जो हानिकारक विषारी पदार्थ बाहेर टाकण्यास आणि त्याचे चयापचय करण्यास मदत करतो.

डिटॉक्सिफिकेशन (विषारी पदार्थ काढून टाकण्याची प्रक्रिया) हे यकृताचे सर्वात महत्त्वाचे कार्य आहे आणि ते पर्यावरणीय विष आणि विविध औषधे यांसारख्या विषाचे रूपांतर कमी हानिकारक पदार्थांमध्ये करतात, जे नंतर आपल्या शरीरातून काढून टाकले जाऊ शकतात. निरोगी यकृत पोषक तत्त्वांच्या चयापचयात, विविध एन्झाइम्स तयार करून चरबीचे पचन आणि आपल्या शरीरातील महत्त्वपूर्ण पोषक घटकांच्या साठवणीतदेखील मोठे योगदान देते. आपली रोगप्रतिकारक कार्ये सुधारण्यात आणि रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यात यकृताची मोठी भूमिका असते. जेव्हा यकृताचे कार्य बिघडते तेव्हा फॅटी लिव्हरसारखे अनेक विकार होऊ शकतात."

यकृताची काळजी घेण्यासाठी त्यांनी खाली काही उपाय सुचविले आहेत

ओमेगा-६ चे सेवन कमी करा आणि ओमेगा-३ चे सेवन वाढवा

ओमेगा-६ फॅटी अॅसिड हे एक प्रकारचे पॉलीअन्सॅच्युरेटेड फॅटी अॅसिड आहे, जे चांगल्या आरोग्यासाठी महत्त्वाचे आहे, परंतु ते कमी प्रमाणात सेवन केले पाहिजे. परिष्कृत आणि प्रक्रिया केलेल्या तेलांमधून भरपूर ओमेगा-६ फॅट्सचे सेवन केल्यामुळे यकृतावर गंभीर दुष्परिणाम होऊ शकतात. ओमेगा-६ फॅट्सचे जास्त सेवन केल्याने यकृताची जळजळ होऊ शकते, ज्यामुळे यकृताचे कार्य बिघडू शकते. ओमेगा-३ फॅट्स, जसे की चिया सीड्स, फ्लेक्स सीड्स, फॅटी फिश इ. जळजळ कमी करण्यास मदत करतात.

नियमित व्यायाम करा

व्यायाम न करण्यामुळे यकृत आणि ओटीपोटाच्या अवयवांमध्ये अॅडिपोज टिश्यू जमा होऊ शकतात, ज्यामुळे विषारी पदार्थ साठतात आणि वजन वाढते. ओटीपोटातील किंवा यकृतावरील जास्त चरबीच्या पातळीमुळे अॅडिपोज टिश्यू जमा होतात. त्यामुळे नियमित व्यायाम करणे यकृताची काळजी घेण्यासाठी महत्त्वाचे आहे.

कमी कार्ब, मध्यम चरबीयुक्त आणि उच्च प्रथिनेयुक्त आहार घ्या

आहारात कमी कार्ब, मध्यम चरबीयुक्त आणि उच्च प्रथिनेयुक्त पदार्थांचा समावेश करा. एका वेळी जास्त प्रमाणात कार्ब सेवन केल्याने जास्त प्रमाणातील कार्बोहायड्रेट्सचे चरबीमध्ये रूपांतर होते.

पुरेशा प्री-बायोटिक्सचे सेवन करा

प्री-बायोटिक्स पित्ताम्लाचे उत्सर्जन वाढवतात आणि त्यामुळे यकृताकडे पित्त परत येण्याचे प्रमाण कमी होते. यामुळे कोलेस्टेरॉल कमी होईल आणि यकृतातील कोलेस्टेरॉलची पातळी कमी होईल.

दारू पिणे टाळा

जास्त प्रमाणात मद्यपान हे यकृताच्या समस्यांचे प्रमुख कारण आहे. यकृत हे डिटॉक्सिफायर म्हणून काम करते आणि अल्कोहोल आणि इतर औषधांमधील विषारी पदार्थ काढून टाकते. जेव्हा या विषारी पेयांचे सेवन यकृताच्या मर्यादेपलीकडे असते, तेव्हा गुंतागुंत टाळण्यास यंत्रणा अपयशी ठरते. आपण या सवयीमध्ये बदल करण्याचा प्रयत्न करत असताना पेयाचे प्रमाण, वारंवारता, प्रकार इत्यादी लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

व्हिटॅमिन सीने समृद्ध अन्न किंवा अॅपल सायडर व्हिनेगरचे सेवन करा

व्हिटॅमिन सी हे एक उत्तम अँटिऑक्सिडंट आहे जे आपल्या शरीरात ऑक्सिडेटिव्ह तणाव टाळण्यास मदत करते. ऑक्सिडेटिव्ह तणाव टाळण्याव्यतिरिक्त, ते यकृतामध्ये चरबी जमा होण्यापासून रोखण्यासदेखील मदत करते

पुरेशी झोप घ्या

झोपेचे विकार, जसे की निद्रानाश, स्लीप अॅपनिया, जास्त झोपणे किंवा कमी झोप इ. यकृताच्या जुनाट आजारांशी निगडित आहेत. दररोज रात्री ६-८ तासांची अखंड झोप घेणे आपल्यासाठी महत्त्वाचे आहे. झोपेच्या कमतरतेमुळे शरीरात पचनसमस्या, त्वचेत बदल, विषारी पदार्थांचा वाढता साठा आणि खराब यकृत डिटॉक्सिफिकेशन यासह मोठ्या समस्या उद्भवू शकतात.

पुरेसे पाणी प्या

यकृत हा विषारी पदार्थ बाहेर टाकणारा एक गंभीर अवयव असून पुरेसे पाणी पिणे यकृताला विषारी पदार्थ काढून टाकण्यास मदत करते. त्यामुळे पुरेशा प्रमाणात पाणी प्या.

## १४ वर्षांच्या मुलावर अनैसर्गिक

अनैसर्गिक अत्याचार व बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण कायद्याअंतर्गत या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींमध्ये दोन अल्पवयीन मुलांचा समावेश आहे. आरोपींनी या कृत्याचे चित्रीकरणही केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. गोरेगाव पूर्व आगार येथील ट्रक स्टॅन्डच्या मागे हा प्रकार घडला. पीडित मुलगा २ मे रोजी घटनास्थळी असताना आरोपी मुले तेथे आले. त्यांनी शिवीगाळ करून जबरदस्तीने त्याला तेथील ट्रक स्टॅन्डच्या मागे नेले. तेथे त्याच्यावर अनैसर्गिक अत्याचार केला. त्यानंतर त्याचे चित्रीकरण केले. या प्रकारामुळे घाबरलेल्या मुलाने याबाबत कोणालाच काही सांगितले नाही. अखेर त्याने याप्रकरणी दिंडोशी पोलिसांकडे तक्रार केली.

## दिसायला चांगली नाही

सुरवातीला सर्व काही सुरळीत सुरु असताना काही दिवसांनी पती गोकुळ नामदेव चव्हाण, सासू विमलबाई नामदेव चव्हाण, कृष्णा नामदेव चव्हाण हे रेश्माला सतत त्रास देऊ लागले. तू दिसायला चांगली नाहीस, तू माहेरून खर्चा साठीरुपये घेऊन ये या कारणाने पती सतत तिला मारहाण करीत असे. दरम्यान 6 मे रोजी देखील पती गोकुळ याच्याकडून रेश्माला बेदम मारहाण करण्यात आली. या बेदम मारहाणीत तिचा मृत्यू झाला आहे. अखेर पोलिसात गुन्हा दाखल... रेश्माला करण्यात आलेल्या मारहाणीत तिचा मृत्यू झाल्याचे तिच्या नातेवाइकांना माहिती मिळाल्याने त्यांनी इस्लापूर पोलिस स्टेशन गाठले. गुन्हा दाखल होत नाही तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही, अशी भूमिका घेतली. त्यानंतर पोलिसांनी नवरा, सासू, दीर यांच्यावर गुन्हा दाखल केला. तर वैद्यकीय अधिकारी मंडगीरकर व जलधरा येथील वैद्यकीय अधिकारी नरवाडे यांनी शवविच्छेदन केले. यावेळी उपविभागीय पोलिस अधिकारी विजय डोंगरे यांनी भेट दिली. तर पुढील तपास सपोनि वाहुळे व उपनिरीक्षक योगेश बोधगिरे हे करीत आहेत.पती नेहमी मारहाण करायचा...

रेश्मा आणि गोकुळ यांच्या लग्नाला दहा वर्षे झाले आहेत. मात्र रेश्मा चांगली दिसत नसल्याचे म्हणत तीच पती तिला नेहमी त्रास द्यायचा. तसेच तिला मारहाण देखील करायचा. सोबतच माहेरून खर्चा साठीरुपये घेऊन ये या कारणाने सतत वाद घालून मारहाण करत असे, असा आरोप रेश्माच्या माहेरच्या लोकांनी दिला आहे. तर पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

## महिलेने दोन

तसेच तिला युवकांसोबत मैत्री करण्याची सवय आहे. तिच्या स्वभावामुळे पतीशी तिचा वाद होत होता. त्यामुळे तिने पतीला सोडले आणि मुलींसह वेगळी राहायला लागली. तिने वस्तीत राहणारा अनिल याच्याशी मैत्री केली. त्याला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. त्याला वारंवार घरी बोलावून त्याच्याशी प्रेमसंबंध ठेवले. अनिल तिच्या प्रेमात आकंठ बुडाला. नेहमी तिच्या घरी जायला लागला. मोनालीने त्याला लग्नाचे आमिष दाखवले. त्यामुळे तो तिच्यावर भाळला. अनिलने मोनालीला महागडे कपडे, भेटवस्तू आणि हॉटेलमध्ये नेण्यास सुरुवात केली. तिच्यावर तो खर्च करायला लागला. प्रेयसीचे खूप प्रेम असल्याचे त्याला वाटू लागले. यादरम्यान मोनालीचा जीव ऑटोचालक असलेला बजरंगी याच्यावर जडला. त्याला तिने प्रेमाच्या जाळ्यात ओढले. तो दिवसभर ऑटोने कमाई करून मोनालीवर उडवायला लागला. दोघेही एकमेकांच्या प्रेमात पडले. यादरम्यान, अनिलशी तिचा दुरावा झाला. अनिलचे ती फोन उचलत नव्हती. त्याला कोणताही बहाणा सांगून टाळाटाळ करायला लागली. त्यामुळे त्याने तिचा पाठलाग केला. ती बजरंगीसोबत फिरताना दिसली. त्यामुळे त्याने मोनालीला वारंवार विचारणा केली. तिने फक्त मित्र असल्याचे सांगून वेळ मारून नेली. शनिवारी रात्री दहा वाजता मोनाली आणि बजरंगी अंधारात एका ठिकाणी गप्पा करीत बसले होते. तेवढ्यात तेथे अनिल आला. त्याने दोघांनाही रंगेहात पकडले. त्याने बजरंगीवर चाकूने हल्ला करीत जीवे मारण्याच प्रयत्न केला. बजरंगीला रक्ताच्या थारोळ्यात बघून मोनाली पळून गेली. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

## धक्कादायक! राज्यात रोज सरासरी

मुलगी जर अल्पवयीन असल्यास पोलीस अशावेळी अपहरणाची नोंद करतात. तसेच मुलगी अल्पवयीन असल्याने तिची ओळख जाहीर होणार नाही या हेतून पोलिसांच्या संकेतस्थळावर याची स्वतंत्र नोंद केली जात नाही. परंतु सज्ञान मुलींच्या बेपत्ता झाल्याची नोंद मात्र पोलिसांच्या संकेतस्थळावर केली जाते. धक्कादायक म्हणजे अल्पवयीन मुलींना पळवून नेऊन त्यांच्यावर लैंगिक अत्याचार झालेल्या मुलींची संख्या अधिक असल्याचे देखील समोर आले आहे. तर याबाबत राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्याशी संपर्क साधला असता हे प्रमाण चिंताजनक असून, मिसिंग सेलने याबाबत कारणे शोधून उपाययोजना करण्याची गरज असल्याची प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे. पुणे, नाशिक, कोल्हापूर, ठाणे, अहमदनगरमध्ये सर्वा धिक प्रमाण शहरांच्या तुलनेत ग्रामीण भागातून मुली बेपत्ता होण्याचे प्रमाण अधिक असल्याचे आकडेवारीतून समोर आले आहे. ज्यात मार्च महिन्याची आकडेवारी पाहिली असता, पुणे 228, नाशिक 161, कोल्हापूर जिल्ह्यातून 114, ठाणे 133, अहमदनगरमधून 101, जळगाव 81, सांगली 82, यवतमाळ 74 युवती बेपत्ता झाल्याची नोंद आहे. तर सर्वा तकमी आकडेवारी हिंगोली 03, सिंधूदुर्ग 03, रत्नागिरी 12, नंदूरबार 14, भंडारा 16 येथून मुली बेपत्ता झाल्याची नोंद करण्यात आली आहे. बेपत्ता झालेल्या मुलींचे प्रमाण (आकडेवारी 2023 ची आहे) जानेवारी : 1600 फेब्रुवारी : 1810 मार्च : 2200 रुपाली चाकणकर यांची प्रतिक्रिया.... दरम्यान यावर प्रतिक्रिया देताना महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर म्हणाल्यात की, राज्यात दिवसेंदिवस मुली आणि महिलांची बेपत्ता होण्याची संख्या वाढते असून, हे चिंताजनक आहे. 2020 पासून महाराष्ट्र हरवलेल्या महिलांच्या बाबतीत नंबर एकवर आहे. आम्ही राज्य महिला आयोगाच्या वतीनं वारंवार पाठपुरावा करत आहोत. नोकरी, लग्न, प्रेमाच आमिष दाखवून मुलींची दिशाभुल केली जात असून, त्यांच्यावर लैंगिक अत्याचार केले जाताहेत. त्यामुळे राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विनंती आहे की, बेपत्ता मुलींचा शोध घेण्यात यावा. तसेच राज्यातील मिसींग सेलचा आढावा घेऊन सूचना द्याव्यात, असे चाकणकर म्हणाल्या आहेत.

## मुंबईकरांनो, सावधान!

तीन ते चार वेळा पैसे मिळाले. मात्र नंतर एका दिवसाला २० लाइकचे टास्क देतानाच गुंतवणुकीची संधी देण्यात आली. चांगला परतावा मिळत असल्याने ट्रेनरने सुमारे दीड लाख रुपये गुंतवले. मात्र पैसे खात्यामध्ये जमा होत नसल्याचे दिसल्याने फसवणूक झाल्याचे तिच्या लक्षात आले.

विक्रोळी येथील तरुणाला यूट्यबुवरील काही पेज सबस्क्राइब आणि लाइक करण्यास सांगण्यात आले. प्रत्येक पेजचे ५० रुपये मिळतील असे सांगून पैसे देण्याऐवजी त्याच्या खात्यातून एक लाख ८५ हजार रुपये परस्पर वळविण्यात आले. कुरारच्या एका तरुणाला टेलिग्राम ग्रुपमध्ये अॅड करण्यात आले. जवळपास २०० सदस्य असलेल्या या ग्रुपमध्ये लाइक, शेअरचे टास्क पूर्ण केल्यावर पैसे मिळतात याबाबत चर्चा सुरू होती. तरुणानेही अॅडमिनला संपर्क साधला आणि पैसे कमवायचा मार्ग जाणून घेतला. सुरुवातीला पैसे मिळायला लागल्याने त्याने गुंतवणुकीचा हा पर्या यनिवडला आणि त्याचे अडीच लाखांचे नुकसान झाले. दादरच्या महापालिका कार्या लयातवैद्यकीय अधिकारी असलेल्या तरुणीला अशाचप्रकारे तब्बल पाच लाख २२ हजारांचा गंडा घातला. तिला लिंकवर जाऊन उत्पादनांना लाइक करून त्याचे स्क्रीनशॉट पाठविण्यास सांगण्यात आले. पार्टटाइम काम चांगले असल्याने वैद्यकीय अधिकारी कामाला लागली, मात्र सायबर चोरांच्या जाळ्यात अडकली.

घरबसल्या हजारो, लाखोंचे उत्पन्न कुणी देणे शक्य नसल्याने अनोळखी क्रमांकावरील संदेशला प्रतिसाद देऊ नका किंवा त्यातील लिंकवर क्लिक किंवा क्रमांकावर संपर्क साधू नका, असे आवाहन ऑनलाइन फसवणुकीच्या या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी केले आहे. कुणालाही बँक खात्याचा तपशील देऊ नका व फसवणूक झाल्यास १९३० या हेल्पलाइनवर संपर्क साधा, असेही त्यांनी म्हटले आहे. फसवणुकीच्या अलीकडील काही घटना

- जोगेश्वरीच्या मेघवाडीतील उच्चपदस्थ अधिकाऱ्याला यूट्यबु व्हिडीओ लाइक करण्यास सांगून सहा लाखांचा गंडा
- घाटकोपरच्या महिलेने सहज उत्पन्नाच्या मोहापायी तीन लाख ९२ हजार रुपये गमावले
- मुलुंडच्या एका विद्यार्थ्या चीसहा लाखांची फसवणूक
- टेलिग्रामच्या माध्यमातून टास्क देऊन मालाडच्या विद्यार्थ्या लाएक लाख ७२ हजारांना फसविले
- प्रसिद्ध हॉटेल्सना लाइक करण्यास सांगून त्याआधारे घाटकोपरच्या विद्यार्थ्या लाचार लाख भरण्यास भाग पाडले
- नोकरीच्या शोधात असलेल्या कांदिवलीच्या तरुणीची पाच लाख ४५ हजारांची फसवणूक

## बोरिवली पोलिसांनी सीसीटीव्ही

तपासाला सुरुवात केली. सीसीटीव्हीची मदत घेऊन तपास : पोलिसांनी सोसायटीच्या आजूबाजूला लावण्यात आलेल्या सीसीटीव्हीची मदत घेऊन तपासाला सुरुवात केली. तपासात ही घटना ज्या इमारतीत घडली, त्या इमारतीच्या शेजारी एक झाड असल्याचे समोर आले. त्याच्या मदतीने चोरट्यांनी 4 तारखेला फ्लॅटमध्ये प्रवेश केल्याचे सीसीटीव्हीमध्ये स्पष्ट दिसून आले. चोरी करून पुन्हा चोर त्याच झाडावरून खाली उतरताना देखील दिसत आहेत. अगोदरच तिथे त्या चोराचा एक मित्र दुचाकी घेऊन पळून जाताना देखील सीसीटीव्हीमध्ये स्पष्टपणे दिसून आले. अनेक चोरीचे गुन्हे दाखल : बोरिवली पोलिस स्टेशनच्या तपास अधिकाऱ्यांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींची ओळख पटवली. ते दोघे अंधेरी आणि जोगेश्वरीचे रहिवासी आहेत. झाडावर चढून चोरी करणाऱ्या व्यक्तीचे नाव संतोष चौधरी (२३) आहे. त्याच्यावर अनेक चोरीचे गुन्हे दाखल आहेत. झिमाद सय्यद (रा. २ जोगेश्वरी, ओशिवरा, अंधेरी) असे अन्य साथीदार चोरट्याचे नाव आहे. त्याच्यावर सहा चोरीचे गुन्हे दाखल आहेत. या दोघांना न्यायालयासमोर हजर केले होते. तेव्हा न्यायालयाने त्यांना आठ मे पर्यंतची पोलीस कोठडी सुनावली आहे. या घटने संबंधित आणि इतरही काही गुन्ह्यासंबंधित तपास बोरिवली पोलीस करत आहेत.

## शरद पवार वारसदार निर्माण

करताच खळबळ माजणे साहजिकच होते. ही खळबळ देशाच्या राजकारणात माजली, त्यापेक्षा जास्त त्यांच्या पक्षात माजली. कारण शरद पवार म्हणजेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष. पवार हे राजकारणातील पुराण वटवृक्षाप्रमाणे आहेत. त्यांनी मूळ काँग्रेस पक्षातून बाहेर पडून 'राष्ट्रवादी' असा स्वतंत्र पक्ष स्थापन केला, चालवला व टिकवला. पण शरद पवार यांच्यानंतर पक्ष पुढे नेणारे नेतृत्व पक्षात उभे राहू शकले नाही." "शरद पवार वारसदार निर्मा ण करण्यात अपयशी ठरले" "पक्षाचा शेंडा-बुडखा, बुंधा सर्व काही महाराष्ट्रातच असल्याने पवारांच्या सर्व च सहकाऱ्यांना जे हवे आहे ते महाराष्ट्रातच. पवार हे राष्ट्रीय पातळीवर मोठे नेते नक्कीच आहेत. त्यांच्या शब्दाला राष्ट्रीय राजकारणात मान असला, तरी पक्ष पुढे नेईल असा वारसदार निर्मा णकरण्यात ते अपयशी ठरले. त्यामुळे चारेक दिवसांपूर्वी निवृत्तीची घोषणा करताच पक्ष बुंध्यापासून हादरला आणि प्रत्येक जण आता आपले कसे होणार? या चिंतेने हादरून गेला," असं मत ठाकरे गटाने व्यक्त केलं. "चार-पाच दिवस सुरू असलेल्या नाट्यावर पडदा" "कार्यकर्ते रस्त्यावर उतरले. पक्षाच्या प्रमुख नेत्यांनी मनधरणी केली आणि लोकभावनेचा आदर राखून पवार यांनी राजीनामा मागे घेतला. यापुढे तेच राष्ट्रवादी काँग्रेसची धुरा सांभाळतील. त्यामुळे गेले चार-पाच दिवस सुरू असलेल्या नाट्यावर पडदा पडला आहे," असंही ठाकरे गटाने नमूद केलं. "भाजपा हा एक पोटदुख्या पक्ष आहे" भाजपाने केलेल्या टीकेवर भाष्य करताना ठाकरे गटाने म्हटलं, "शरद पवार यांनी जे राजीनामा नाट्य केले ते 'नौटंकी' होते, अशी टीका भाजपाने केली. भाजपा हा एक पोटदुख्या पक्ष आहे. दुसऱ्यांचे चांगले व्हावे किंवा बरे घडावे असे त्यांना कधीच वाटत नाही. इतरांचे पक्ष किंवा घरे मोडून हा पक्ष उभा राहिला आहे. दुसरे असे की, इतरांवर 'नौटंकी' असा आरोप करण्यापूर्वी जगातील सगळ्यात मोठे नौटंकीबाज म्हणून ख्यातकीर्त पावलेल्या आपल्या पंतप्रधान मोदींकडे त्यांनी आधी पाहायला हवे. देशाच्या राजकारणाची 'नौटंकी' करणाऱ्यांना दुसऱ्यांच्या घडामोडी नौटंकीच वाटणार."

"'लॉजिंग-बोर्डिंग'ची व्यवस्था पूर्ण झाल्याचे बोलले जात होते, मात्र..."

"भाजपाची पोटदुखी अशी की, शिवसेनेप्रमाणे राष्ट्रवादी काँग्रेस फोडण्याचा त्यांचा 'प्लॅन' होता. लोक बॅगा भरून तयारच होते आणि येणाऱ्यांच्या 'लॉजिंग-बोर्डिंग'ची व्यवस्था पूर्ण झाल्याचे बोलले जात होते. मात्र, शरद पवारांच्या खेळीने भाजपाचा "प्लॅन' कचऱ्याच्या टोपलीत गेला आणि त्यांची पोटदुखी वाढत गेली. पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष भाजपाच्या तंबूत न्यावा आणि आपल्या सहकाऱ्यांची ईडी, सीबीआय, इन्कम टॅक्सच्या छळातून सुटका करावी, असा एका गटाचा आग्रह होता. पवारांनी ते करण्यास नकार दिला," असं ठाकरे गटाने म्हटलं.

## सत्तासंघर्षाचा निकाल येत्या

गटातील आमदारांच्या व भाजपच्या पाठिंब्यावर अॅड. राहुल नार्वेकर हे विधानसभा अध्यक्ष झाले आहेत. दहाव्या परिशिष्टानुसार आमदार अपात्रतेबाबत निर्णयाचा अधिकार अध्यक्षांना असला तरी ते याच आमदारांच्या पाठिंब्यावर निवडून आल्यामुळे नबम रेबिया प्रकरणातील तर्का नुसार त्यांनाही निर्णयाचा अधिकार उरत नाही. त्यामुळे विधानसभा अध्यक्षांची निवड आणि शिंदे-फडणवीस सरकारने बंडखोर आमदारांच्या पाठिंब्याने जिंकलेला विश्वासदर्शक ठराव वैध आहे की नाही, या बाबी सर्वोच्च न्यायालय तपासणार आहे. आमदार अपात्रतेसंदर्भा तील याचिका विधानसभा अध्यक्षांकडे सुनावणीसाठी पाठवायच्या असतील, तर त्याआधी त्यांची निवड वैध ठरविण्याची आवश्यकता आहे. नवब रेबियाप्रकरणी सात सदस्यीय घटनापीठाकडून फेरविचाराची गरज आहे की नाही, याबाबतही न्यायालयाकडून निर्णय अपेक्षित आहे.दोन शक्यतांची सत्तावर्तुळात चर्चा घटनापीठाने शिंदे गटाच्या १६ आमदारांना अपात्र ठरविल्यास मुख्यमंत्र्यांना तातडीने राजीनामा द्यावा लागेल. त्यानंतर नव्याने सरकार स्थापन करण्याचे सर्व सोपस्कार पार पाडावे लागतील. आमदार अपात्रतेचा निर्णय विद्यमान विधानसभा अध्यक्षांकडे सोपविला गेला, तर मात्र पुढील निवडणुकीपर्यंत सध्याची स्थिती कायम ठेवणे शिंदे-फडणवीस सरकारला शक्य होणार आहे.

## 85 वर्षीय वृद्धाची केअरटेकरने

एकटे राहत असल्याने त्यांची काळजी घेण्यासाठी एक केअरटेकर आणि एक गृहिणी नेमण्यात आली होती. घरातील मोलकरीण स्वयंपाक आणि साफसफाई करून निघून जायची तर केअरटेकर हा दिवस व रात्रं त्यांच्याबरोबर राहायचा.

केअरटेकर मुरलीधर नाईक यांच्यासोबत बेडरूममध्ये झोपायचा. सकाळी स्वयंपाकासाठी कामाला आल्यानंतर त्यांनी बेडरूमचा दरवाजा उघडा पाहिला. मुरलीधर यांना मृतअवस्थेत पाहिल्यानंतर त्यांनी शेजारच्यांना कळवले. मग त्यांनी विलेपार्ले येथे राहत असलेल्या आपल्या मुलाला या संदर्भा तमाहिती दिली. मुरलीधर यांच्या मुलाने पोलिसांना या संदर्भा त माहिती दिली व पोलिसांनी घटनास्थळी येऊन पुढील तपास सुरू केला.

**कोण आहे केअर टेकर?**

- ✪ कृष्णा मनबहादूर पेरियार 30 वर्ष असे या आरोपी केअर टेकर नाव होते
- ✪ आरोपी केअर टेकर कृष्णा याची 1 मे म्हणजे आठ दिवस अगोदर नियुक्ती करण्यात आली होती
- ✪ सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार केअर टेकर हा गेल्या आठ दिवसापासून खाली उतरलाच नव्हता
- ✪ मध्यरात्री ही हत्या केल्यानंतर आरोपी कृष्णा हा फरार झाला
- ✪ त्यांने सोन्याची चेन व रुद्राक्ष माला चोरी केली आहे असा पोलिसांना संशय आहे.

सांताक्रुझ पोलिसांनी यासंदर्भा तविविध भादवि कलम प्रमाणे गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केलेला आहे. सांताक्रुझ पोलीस त्यांच्या घरी असून यासंदर्भा तचीसर्व चौकशी करून पुरावे गोळा करण्याचा काम करत आहे. मुंबई गुन्हे शाखाही समांतर तपास करत आहे. केअरटेकरची नियुक्ती कोणत्या एजन्सी मार्फत करण्यात आली होती की अन्य कुणाकडून, याचा पोलीस तपास करत आहेत. आरोपीला शोधण्यासाठी पोलीस सीसीटीव्ही मदत घेत आहे. मात्र कुठल्याही केअर टेकर नेमणूक करायच्या अगोदर त्याची सविस्तर चौकशी करावी असा पोलिसांनी आवाहन केले आहे.

## पालकांनो, अल्पवयीन मुलींकडे

अल्पवयीन मुली पळून जाण्याचे प्रमाण वाढले आहे. बीड जिल्ह्यात पाच दिवसाला एक अल्पवयीन मुलगी गायब होत आहे. त्यामुळे 'सोळावं वरीस धोक्याचं,' हे यानिमित्ताने आता खरे ठरू लागले आहे. तर गायब झालेल्या मुलींमध्ये 14 ते 18 वर्षा तील मुली गायब होण्याचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येत आहे. अगदी दहावीच्या वर्गा तशिकणारी मुलगीही प्रेमात पडून प्रियकरासोबत धूम ठोकत आहे. त्यामुळे पालकांची देखील चिंता वाढली आहे. तर 18 वर्षांच्या आतील मुलगा अथवा मुलीला पळवून नेले किंवा बेपत्ता झाली तर कलम 363 नुसार अपहरणाचा गुन्हा दाखल केला जातो. परंतु वास्तविकता हे खरोखरच अपहरण असते का? याबाबत प्रश्न असतो. पालकांनी देखील काळजी घेण्याची गरज... विशेष म्हणजे मुली बेपत्ता होणाऱ्या घटनेला पालकही तेवढेच जबाबदार आहेत. कारण पालकांकडून आपल्या पाल्यांना विश्वासात घेतले जात नाही. कामाच्या ओघात त्यांच्याकडे दुर्ल क्ष केले जात आहे. याचाच गैरफायदा प्रियकर मुले घेताना पाहायला मिळत आहे. मुलींना वेगवेगळे आमिष दाखवत दोघेही सैराट होतात. त्यामुळे पालकांनी कामातून वेळ काढत आपल्या मुलीकडे देखील वेळ दिले पाहिजे. त्यांच्या अडचणी समजून घेऊन, त्यांना कुटुंबाचे प्रेम दिले पाहिजे. राज्यात रोज सरासरी 70 मुली बेपत्ता.. तरुणी बेपत्ता होण्याबाबत राज्यातील धक्कादायक आकडेवारी समोर आली आहे. राज्यात गेल्या तीन महिन्यात 18 ते 25 वयोगटातील तरुणी बेपत्ता होण्याचे प्रमाण वाढले आहे. नवीन वर्षा च्या एकट्या मार्च महिन्यात तब्बल 2200 मुली बेपत्ता झाल्या असल्याची नोंद झाली आहे. म्हणजेच राज्यात रोज सरासरी 70 मुली बेपत्ता होत असल्याची आकडेवारी समोर आली आहे. विशेष म्हणजे बेपत्ता तरुणींमध्ये सर्वा धिक 18 ते 20 या वयोगटातील मुलींचा समावेश असल्याचे देखील समोर आलंय. तर जानेवारी महिन्यात 1600 आणि फेब्रुवारी महिन्यात 1810 मुली बेपत्ता झाल्या असल्याचे आकडेवारीतून समोर आले आहे.

## 'मॅफेड्रॉन' अंमली पदार्थ विक्री

साठा केला असल्याचे निष्पन्न झाले. मुद्देमाल जप्त करण्यात आला असून त्याप्रकरणी आरोपी मरजहाँ ऊर्फ गुडीया ताजुद्दीन शेख आणि अली असगर हुसेन भाडेला, रा. रेतीबंदर, घोडबंदर यांच्याविरुद्ध काशिमीरा पोलीस ठाण्यात एन.डी.पी.एस. कायदा १९८५ चे कलम ८ (क), २१(क), २९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या पोलिसांचा कारवाईत सहभागः ही कारवाई जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १, मिरारोड यांच्या अधिपत्याखाली स.पो.नि. दत्तूसाहेब लोंढे, स.फौ. अजय मांडोळे, पो.हवा. संतोष क्षीरसागर, विनोद चव्हाण, मिरारोड पोलीस ठाण्याचे स.पो.नि. योगेश पाटील, पो.हवा. बबन हरणे, म.पो. भाग्यश्री माने तसेच काशिमीरा पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी यांनी केली आहे.

संपादकीय...



# हाच का महिलांचा सन्मान?

'निर्भ या' घटनेनंतर 'विशाखा' मार्गदर्शक तत्त्वे व त्यातील तरतुदी अधिक कठोर करण्यात आल्या. महिलांचे लैंगिक शोषण करणाऱ्यांना सुटता येणार नाही, याची त्यांत काळजी घेण्यात आली. परंतु प्रत्यक्षातील चित्र काय आहे?

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा, ऑलिम्पिक अशा विविध आंतरराष्ट्रीय स्पर्धेत पदके पटकावित देशाचे नाव जगात सुवर्णाक्षरात कोरणाऱ्या महिला कुस्तीपटूंचे आक्रंदन सरकार ऐकणार की नाही?

गे ला आठवडाभर कर्नाटकातील प्रचारसभांत पंतप्रधान नरेंद्र मोदींचे भाषण कानावर धडकत होते. त्यात डबल इंजिनच्या सरकारकडून महिलांचे सक्षमीकरण आणि त्यांच्या सन्मानाचा उल्लेख होताना ऐकले. नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यानंतर 'बेटी बचाव, बेटी पढाओ' हे धडक अभियान राबविण्यात आले.

परंतु देशात महिलांचा खरच सन्मान होतो का? लैंगिक शोषणाचे गंभीर आरोप झालेला आरोपी हा केवळ भाजपचा नेता आहे म्हणून मोकाट फिरतो. ज्या भारतीय कन्यांनी पदके मिळवत देशाचे नाव जगात पोहचविले त्यांना पोलिसांकडून लाठ्या खाव्या लागतात. सरकारच्या भूमिकेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दिल्लीच्या `जंतरमंतर'वरील पोलिसांची कृती ही देशाला शरमेने मान खाली घालायला लावणारी आहे. तर दुसरीकडे निर्भ याप्रकरणात हातात मेणबत्या घेऊन जंतरमंतरवर जमा होणारे हजारोंचे जत्थे आता मात्र गायब झाले आहेत.

२०१२ मध्ये झालेल्या 'निर्भ या' घटनेनंतर 'विशाखा' मार्गदर्शक तत्त्वे व तरतुदी अधिक कठोर करण्यात आल्या. महिलांचे लैंगिक शोषण करणाऱ्यांना सुटता येणार नाही, याची काळजी घेण्यात आली.

परंतु सन्मान, समानता, सक्षमीकरण हे शब्द केवळ भाषणापुरते मर्यादित राहिले आणि पीडित कन्यांना न्याय देण्यापेक्षा त्यांनाही राजकारणात ओढले गेले. घटना आहे 'जंतरमंतर'वरचीच. अनेक अडचणींवर मात करीत राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा,

ऑलिम्पिक अशा विविध आंतरराष्ट्रीय स्पर्धेत पदके पटकावित देशाचे नाव जगात सुवर्णाक्षरात कोरणाऱ्या महिला कुस्तीपटूंची ही कहाणी आहे. हरयाणातील आतंरराष्ट्रीय ख्यातीच्या सात महिला कुस्तीपटूंनी भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष आणि भाजपचे खासदार ब्रिजभूषण शरण सिंह यांच्यावर लैंगिक शोषणाचे आरोप केले आहेत. हे आरोप आजचे नाहीत.

ब्रिजभूषणवर गुन्हा दाखल व्हावा म्हणून जानेवारी महिन्यात कुस्तीपटूंनी विनेश फोगट, साक्षी मलिक, बजरंग पूनिया, रवी दहिया आदींच्या नेतृत्वात 'जंतरमंतर'वर धरणे देऊन देशाचे लक्ष वेधले होते. त्यावेळी सरकार हादरले आणि लगेच चर्चेच्या फेऱ्या सुरू झाल्या. क्रीडामंत्री अनुराग ठाकुर यांनी मध्यस्थी केली.

भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्षा पी.टी. उषा यांनी चौकशी समिती स्थापन केली. एम.सी. मेरी कोम यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती अद्यापही जिवंत आहे. या समितीतील सदस्य कोणत्या राजकीय पक्षाशी संबंधित आहेत, याचा शोध घेतला तर समितीचे गांभीर्यही लक्षात येईल.

समिती महिनाभरात अहवाल देईल, असे सांगण्यात आल्याने आंदोलन गुंडाळण्यात आले. तत्पूर्वी विनेश फोगाट हिने ऑक्टोबर २०२१मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींची भेट घेतली आणि ब्रिजमोहनच्या काळ्या कृत्यांबाबत माहिती दिली. दीड वर्ष होऊनही मोदींनी कोणतीच कारवाई केली नाही, याकडे विनेश लक्ष वेधत आहे.

साडेतीन महिने होऊनही समितीचा अहवाल आला नाही आणि आरोपीवर कारवाई नाही. दरम्यान ब्रिजभूषणवर ज्या महिला कुस्तीपटूंनी आरोप केलेत त्यांनी समितीला, पोलिसांना लेखी निवेदन दिले आहे. यातील एक मुलगी अल्पवयीन आहे. एका कुस्तीपटूने २०१६मधील तुर्कीचा प्रसंग नोंदवला आहे.

ब्रिजभूषणने छातीवरून हात फिरवल्याचे तिने प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे. तर आपल्याला त्यांनी ओढून जवळ घेतल्याचा आरोप दुसऱ्या एका मुलीने केला आहे. ब्रिजभूषण मात्र यावर 'पित्याच्या ममतेने जवळ केले', असा खुलासा करीत आहे. २०१६ ते २०१८ पर्यंत घडलेल्या अनेक घटना तक्रारीत नमूद करण्यात आल्या आहेत. महिला खेळाडूंनी श्वास कसा घ्यावा हे सांगण्याचे निमित्त करून ते शरीराच्या विविध भागांना चुकीचा स्पर्श करीत असल्याचेही तक्रारीत म्हटले आहे.

सर्वोच्च न्यायालयात धाव

न्याय मिळत नाही म्हणून सगळेच नामवंत कुस्तीपटू पुन्हा २३ एप्रिलपासून 'जंतरमंतर'वर धरणे देऊन बसले आहेत. गंभीर आरोप असूनही पोलीस तक्रार नोंदवायला तयार नव्हते. शेवटी सर्वोच्च न्यायालयात धाव घ्यावी लागली. न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर ब्रिजभूषणवर 'पोक्सो' कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

अल्पवयीन मुलीच्या विनयभंगाच्या गुन्ह्यात आरोपीला त्वरित अटक करणे अनिवार्य होते. परंतु पोलिसांनी ते धाडस दाखवले नाही. ब्रिजभूषण काही वाहिन्यांवर मुलाखती देत आहेत. 'गृहमंत्री अमित शहा आणि भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी. नड्डा म्हणत असतील तर मला अटक करा', असे खुलेआम सांगत फिरत आहेत. याचा काय अर्थ घ्यायचा?

सहा वेळा खासदार आणि एक दशकापेक्षा अधिक काळ कुस्ती महासंघाचे अध्यक्ष असलेले ६६ वर्षीय ब्रिजभूषण सिंह दबंग आहेत. उत्तरप्रदेशातील कैसरगंज लोकसभा क्षेत्रात ते बाहुबली म्हणून ओळखले जातात. स्वत: पहिलवान आहेत.

# युक्रेनच्या क्रेमलिन ड्रोन हल्यामुळे रशियाकडुन युक्रेनसह विश्वाची महाविणाशाकडे वाटचाल?

गेल्या 14 महिन्यांपासून युक्रेन-रशिया युद्ध सुरू आहे.या युद्धात दोन्ही पक्ष मागे हटायला तयार नाहीत.यामुळे दोन्ही देशांची वित्तीय हानी, लाखोंच्या संख्येने मानवीय हानी व सैन्य हानी होत आहे आणि याचा परिणाम संपूर्ण जगावर पडत आहे.परंतु युद्ध थांबवीण्यासाठी मधला मार्ग युक्रेन,युनो,नाटो किंवा अमेरिका काढायला तयार नाही.युक्रेन नाटोमध्ये सहभागी होवू नये यासाठी रशिया युक्रेनसोबत आरपारची लढाई लढण्यास वचनबद्ध आहे,तर युक्रेन नाटोमध्ये सहभागी होण्याची जीद्दीवर अडून असल्याने रशिया सोबत दोन-दोन हात आहे. यामुळेच आज युक्रेन रक्ताच्या लाथोळयात वावरत असुन स्मशानभूमीमध्ये रूपांतर झाल्याचे दिसून येते.परंतु दिवसेंदिवस रशिया-युक्रेन युद्ध अतिशिगेला पोहचल्याने जगात केव्हा विनाशाची चिंगारी निर्माण होईल हे सांगता येत नाही.कारण गेल्या चौदा महिन्यांपासून युक्रेन -रशिया युद्धाचा संपूर्ण जगावर दळणवळणाच्या बाबतीत व आंतरराष्ट्रीय पातळीवरील अन्य देवाणघेवाणावर विपरीत परिणाम होत आहे. अशीच परिस्थिती राहली तर पुढेचालुन महाभयावह परिणाम संपूर्ण जगाला भोगावे लागु शकते याला नाकारता येत नाही.कारण युक्रेन -रशिया यांच्यातील युद्ध दिवसेंदिवस तीव्र आणि अक्राळविक्राळ रूप धारण करीत आहे. युक्रेनकडुन 3 मे 2023 च्या मध्यरात्री स्थानिक वेळेनुसार पहाटे अडीच वाजताच्या सुमारास रशियाच्या अध्यक्षांचे निवासस्थान असलेल्या क्रेमलिनवर ड्रोन हल्ला करण्यात आला.हा हल्ला म्हणजे नियोजित दहशतवादी कट होता आणि यातून पुतीन याची हत्या करण्याचा प्रयत्न होता आणि यात युक्रेनचा पुर्णपणे हात असल्याचे रशियन सुत्रांनी सांगितले आहे. कारण 9 मे ला रशिया दरवर्षी विजयी दिवस साजरा करीत असतो. परंतु विजयी दिवसाच्या पुर्वसंध्येला हा हल्ला घडवून आणण्यात आला.कारण या दिवसांसाठी परदेशी पाहुणे आली असून त्या दृष्टीकोणातुन हा हल्ला झाल्याची शक्यता आहे असे रशियन सरकारने म्हटले आहे.यामुळे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्या हत्येचा कट युक्रेनच्या माध्यमातून होत असल्याचा आरोपही रशियाने केला आहे. दोन ड्रोनव्दारे क्रेमलिनवर हल्याचा प्रयत्न झाला. मात्र हे हल्ले तातडीने निष्क्रिय करण्यात आले. हल्याच्या वेळी पुतीन क्रेमलिनमध्ये नसल्याचे रशियन प्रशासकिय अधिकाऱ्यांनी सांगितले.परंतु क्रेमलिनवर ड्रोन हल्या हा संपूर्ण रशियावर हल्ला असे समजून पुतीन व रशिया प्रशासन आगबबुला झाले आहेत आणि सध्याच्या परिस्थितीत रशियाने युक्रेनवर अंधाधुंद मोठ्या प्रमाणात मिसाईलचा व बॉम्बचा वर्षाव सुरू केला आहे.आता रशियाकडून होत असलेले हल्ले न भूतो न भविष्यती अशाप्रकारचे होत असल्याचे सांगितले जाते.कारण रशियाने युक्रेनसह नाटो देशांना अनेकदा ताकीद दिली आहे आहे की रशिया अत्यंत घातक व विध्वंसकारी क्षेपणास्त्राचा केव्हाही वापर करू शकतो आणि त्या अनुषंगाने रशियाने अत्याधुनिक घातक मिसाईलचा जमावडा आपल्या मित्र राष्ट्रांच्या सिमांवर करून ठेवला आहे.कारण युक्रेनचा क्रेमलिन वरील हल्ला म्हणजे रशियाच्या काळजात केलेला वार आहे (सापाच्या शेपटीवर युक्रेनने पाय ठेवला आहे) त्यामुळे क्रेमलिन हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर जो कोणी युक्रेनच्या मदतीला येईल त्याला सुद्धा नेस्तनाबूत करण्याचे व्लादिमीर पुतीन यांनी सध्याच्या परिस्थितीत मनात पुर्णपणे ठाणले आहे. कारण रशियाच्या अनेक नेत्यांनी व अधिकाऱ्यांनी आरपारची लढाई लढुन किव्हसह युक्रेनला नेस्तनाबूत करण्याचे ठरविले आहे.त्यामुळे यापुढील रशिया-युक्रेन युद्ध सिमित नसुन आता विश्व युध्दाच्या अगदी जवळ आल्याचे दिसून येते. क्रेमलिनवरील ड्रोन हल्ल्यानंतर रशियाने तीव्र शब्दांत प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.यापुढे युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांच्याशी कोणतीही वाटाघाटी करू नये असे राजकीय गोटातून सुर निघत आहे. त्याचबरोबर किव्हला नष्ट करण्याचे आव्हान रशियन अधिकाऱ्यांनी केले आहे म्हणजेच रशिया युक्रेन युद्ध महाविणाशाकडे जातांना दिसत आहे.आतापर्यंत रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्यावर सहा वेळा जीवघेणा हल्ला करण्याचा प्रयत्न करण्यात आला.परंतु आताचा क्रेमलिन येथील पुतीन यांच्या निवासस्थानी हल्ला युद्धजन्य परिस्थिती युक्रेनने केल्याने रशिया युक्रेनसोबत आरपारच्या युद्धाच्या मुडमध्ये आहे. त्यामुळे रशिया युक्रेनला पुर्णपणे जमिनदोस्त करण्याच्या तयारीत आहे.यात युक्रेनची जोहीकोणी मदत करेल त्यालाही जमिनदोस्त करण्यात येईल अशा साफ शब्दात पुतीनने युक्रेनच्या मित्र राष्ट्रांना व नाटोला खुला इशारा



दिला आहे.युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांनी क्रैमलिनवरील ड्रोन हल्ल्याचा युक्रेनशी काहीही संबंध नसल्याचे म्हटले आहे.परंतु रशियाचा संपूर्ण शक युक्रेनवर असल्याने अत्याधुनिक मिसाईलचे व हवाई हल्ले पुर्वीपेक्षा तेज केल्याचे दिसून येते.युक्रेनने सध्याच्या परिस्थितीत सापाच्या बिळात हात टाकलेला आहे.त्यामुळे युक्रेनवर विनाशाचे काळे ढग मंडरावतांना दिसत आहे.त्यामुळे जगातील देशांनो सावधान! जगातील महत्वपूर्ण देशांनी भारताच्या मदतीने रशिया -युक्रेन युद्ध कोणत्याही परिस्थितीत थांबवायला हवे अन्यथा विनाशकारी विपरीत बुध्दी होवू शकते व संपूर्ण जगात आपल्या मृत्यूचा आक्रोश निर्माण झालेला दिसु शकतो.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**

# ईशान्येची आग

राजधानी दिल्लीत लैंगिक अत्याचारांविरोधात गेले काही दिवस धरणे आंदोलन करणाऱ्या महिला कुस्तीपटूंबाबत त्यांच्यासारखीच क्रीडानिपुण बॉक्सर मेरी कोम यांनी काही पाठिंबा दिला होता किंवा काय हे माहीत नाही. तथापि आपले मातृराज्य मणिपूरमध्ये आंदोलन सुरू झाल्याबरोबर माझे मणिपूर वाचवा अशी करुण हाक या कोमबाई देतात. या कोमबाई राज्यसभेच्या राष्ट्रपती नियुक्त खासदार आहेत आणि पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर वर्षभरातच नरेंद्र मोदी यांनी त्यांस खास भेटीस बोलवून त्यांचा गौरव केल्याचा इतिहासही आहे. तथापि या कोमबाई मणिपूर-वाचवा असा टाहो फोडताना त्या राज्याचे मुख्यमंत्री बीरेन सिंह यांच्याविषयी फार काही बोलताना दिसत नाहीत, ही बाब पुरेशी सूचक. माझे राज्य वाचवा अशी हाक द्यायची पण ती देण्याची वेळ का आली याबाबत मात्र काही बोलावयाचे नाही, असे हे कोमबाईंचे चातुर्य. त्यांच्या होरपळणाऱ्या राज्याचे मुख्यमंत्री हे सध्या भाजपमध्ये आहेत. सध्या अशासाठी म्हणायचे कारण सहा-सात वर्षांपर्यंत ते काँग्रेसचे ज्येष्ठ नेते म्हणून गणले जात. गेल्या काही वर्षांत भाजपत आले आणि पवित्र झाले अशा अनेक अन्य पक्षीयांतील नामांकितांतील ते एक. भाजपत आल्यावर आपण मूळ भाजपवासीयांपेक्षाही अधिक हिंदूत्ववादी आहोत हे दाखवण्याचा खुळा नाद अनेकांना जडतो. सिंह त्यांपैकी एक. अलीकडच्या प्रथेप्रमाणे स्वधर्म प्रेमप्रदर्शन करणे म्हणजे अन्य धर्मीयांविरोधात काही ना काही करीत राहणे असे असल्याने या सिंह साहेबांनी आपल्या राज्यातील सामाजिक आणि धार्मिक समीकरणे नव्याने आखण्याचा प्रयत्न केला. त्याची परिणती संपूर्ण मणिपूरचे रूपांतर ज्वालामुखीत होण्यात झाली असून बुधवारच्या तीव्र जाळपोळीनंतर त्या राज्यात लष्करास पाचारण करण्याची वेळ प्रशासनावर आली. जोडीला सार्वत्रिक इंटरनेट बंदी वगैरे उपाय आहेतच. या उद्रेकास जबाबदार कारणांवर भाष्य करण्याआधी सिंह यांच्या उद्योगांचे वास्तव लक्षात घ्यायला हवे. याचे कारण ताज्या उद्रेकामागे मैतेइ या स्थानिक जमातीचे आरक्षण आणि त्याबाबत उच्च न्यायालयाचा निर्णय इत्यादी कारणे प्राधान्याने पुढे केली जातील. बुधवारची जाळपोळ मैतेइंच्या मोर्चानंतर घडली हे खरे. तथापि या कारणांच्या आधीपासूनच सिंह यांच्या हडेलहप्पी आणि 'हम करेसो' वृत्तीमुळे सत्ताधारी पक्षात खदखद होती आणि चार आमदारांच्या राजीनाम्याने ती बाहेर पडली. गेल्या महिन्यात १३ एप्रिलला मुख्यमंत्री सिंह यांचे सल्लागार आणि आमदार राधेश्याम सिंह यांनी राजीनामा दिला. हे राधेश्याम सिंह माजी 'आयपीएस' अधिकारी. असे उच्चपदस्थ सनदी अधिकारी एकेकाळी पायउतार झाले की काँग्रेस पक्षात सामील होत. आता ते भाजपत जातात. त्याप्रमाणे हे राधेश्यामही भाजपत दाखल झाले आणि त्यांच्याप्रमाणे माजी आयएएस अधिकारी रघुमणी सिंह यांनी देश घडवण्यासाठी भाजपचे सदस्यत्व स्वीकारले. तेही आमदार. पण त्यांनीही २४ एप्रिलला सरकारी पदाचा राजीनामा दिला. या दोन राजीनाम्यांच्या दरम्यान आणखी दोघा आमदारांनी आपापल्या पदांचा त्याग केला. तेव्हा पक्षातील हे घोंघावते वादळ कसे हाताळावे यासाठी २१ एप्रिलला भाजपची स्थानिक बैठक बोलावली गेली. तीन आमदार आणि मंत्री सहभागी असणे अपेक्षित होते. त्याच दिवशी आमदार राजकुमार सिंह यांनी मुख्यमंत्र्यांची तरफदारी करत सर्व सहभागींना दम भरला. "पक्षातील कुरबुरी घेऊन माध्यमांकडे गेलात तर.." अथवा पक्षासंदर्भात अन्य कोणाकडे तक्रार करू पाहाल तर याद राखा अशी तंबी या राजकुमाराने दिली. एरवी ती दुर्लक्षिली गेली असती. पण हे राजकुमार सिंह पडले मुख्यमंत्र्यांचे जामात. त्यामुळे सिंह यांची कार्यशैली अधिकच प्रखरपणे उघड झाली. या सर्वामुळे अर्थातच मुख्यमंत्री बदलाच्या मागणीस जोर चढला आणि सत्ताधारी पक्षाचे डझनभर आमदार श्रेष्ठींच्या कानावर ही मागणी घालण्यासाठी दिल्लीत येऊन थडकल्याच्या बातम्या आल्या.

# कुस्तीची लक्तरे वेशीवर !

भारतीय कुस्ती महासंघ अर्थात डब्ल्यू.एफ.आय चे अध्यक्ष तथा भाजपा खासदार ब्रिजभूषण शरण सिंह यांच्यावर भारतीय कुस्तीपटूंनी लैंगिक शोषण करण्याचा आरोप केल्याने कुस्तीसहीत संपूर्ण क्रिडा विश्वाला भूकंपाचे धक्के लागले आहे.त्यानंतर कुस्तीपटू चा एफ.आय.आर दाखल करून घेण्यास दिल्ली पोलीस टाळाटाळ करीत असल्याने कुस्तीपटूंनी जंतर मंतर येथे आंदोलनाचे हत्यार १८ जानेवारी रोजी प्रथम उपसले होते.परंतु,त्यानंतर त्यांना कारवाई चे आश्वासन देऊन समित्या स्थापन केल्याने त्यांनी त्यांचे आंदोलन थांबविले होते.दरम्यान कुठलीही कारवाई होत नसल्याने त्यांनी सुप्रीम कोर्टाचा दरवाजा ठोठावत न्याय मागण्याचा प्रयत्न केल्याने सर्वोच्च न्यायालयाच्या दार ठोठावण्यावरून ब्रिजभूषण यांच्याविरुद्ध एफ.आय.आर दाखल करण्यात आला होता.सदरच्या प्रकरणी सात महिला कुस्तीपटू त्यापैकी एक अल्पवयीन ने तक्रार दाखल केली होती.परंतु,एफ.आय.आर दाखल झाल्या नंतरही पोलिसांनी त्यांच्याविरुद्ध कारवाही करून अटक केलेली नसल्यामुळे त्यांनी त्यांचे आंदोलन जसेच्या तसेच जोपर्यंत आरोपीला अटक होत नाही तोपर्यंत सुरूच ठेवण्याचा निर्धार केलेला आहे.आरोपींनी गुन्हा केल्यानंतर त्याला अटक कधी होते ? या प्रश्नांचे उत्तर हे आरोपीने केलेल्या अपराधांवर अवलंबून असते.जर त्याने गंभीर दखलपात्र गुन्हा केला असेल तर त्याला अटक होते आणि जर त्याने अदखलपात्र गुन्हा केला असेल तर त्याला अटक होत नाही.अर्नेशकुमार विरूद्ध बिहार सरकार या प्रकरणात भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने अटके बाबत काही मार्गदर्शक तत्वे घालून दिलेली आहे.त्याचे पालन करणे आवश्यक असते.जेव्हा आरोपी कडून सात वर्षापेक्षा कमी शिक्षेचा गुन्हा करण्यात आला असेल त्यावेळी पोलिस त्याला सरळसरळ अटक न करता सीआरपीसी कायद्याच्या कलम ४१(ए) नुसार आरोपी ला उपस्थितीसाठी नोटीस काढतात.अटक करणे गरजेचे नाही.त्यानंतर आरोपीला अटक न करण्याचे अथवा अटक करण्याचे कारण नोंदवून कार्यवाही करावी लागते.सरदरच्या महिला कुस्तीपटूचा हा संवेदनशील विषय आहे.वेगवेगळया खेळांमध्ये मेडलिस्ट हे ख्यातनाम व्यक्ती असूनही त्यांची तक्रार ही प्रथम पोलिसांनी दाखल करून घेतली नव्हती.वास्तविकपणे भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निकालामध्ये म्हटलेले आहे की,दखलपात्र अपराध,महिला संबंधित अपराधामध्ये एफ.आय.आर तात्काळ दाखल करून त्यावर उचित कार्यवाही करावी.ललिता कुमारी जजमेंट नुसार एफ.आय.आर दाखल करण्या करिता काही मार्गदर्शक तत्वे घालून देण्यात आली आहे.त्यानुसार दखलपात्र अपराधामध्ये पोलिसांनी एफ.आय.आर दाखल करुन घेणे हे अनिवार्य केलेले असले तरी काही बाबतीत ते प्राथमिक चौकशी करून निर्णय घेऊ शकते.तथापी,साधारणपणे अशा अपराधामध्ये एफ.आय.आर दाखल झाल्यानंतर लगेच फौजदारी प्रक्रिया कार्यान्वित होत असते.म्हणून तो नीट व उशीर न होता घटनेनंतर लगेच दाखल होणे गरजेचे असते.आजही आपण अशा समाजामध्ये राहतो जेथे 'गुड टच,बॅड टच व लैंगिक शोषण' या मुद्द्यावर आपण जाहीर बोलत नाही.आपला समाज आपल्याला लैंगिक शिक्षण या मुद्द्यावर सार्वत्रिकरित्या स्वीकृत करीत नाही.समाज सोडा,तो खूप दूरचा विषय आहे.जर एखाद्याने त्याच्या सोबत अशा लैंगिक शोषणाची घटना घडल्याचे त्याचे घरी कळविल्यावर त्याला त्याच्या कामाच्या ठिकाणी त्याचे पालक पाठवित नाही.त्या व्यक्ती सोबतच त्याच्या परिवाराला सुद्धा गावात शहरात दोन-चार गोष्टी ऐकूण घ्यावे लागते.लैंगिक हव्यासापोटी व्यसनांध लांडग्याच्या नजरेला कुणी खेळाडू बळी पडणे हे फक्त त्या एका व्यक्ती विरुद्ध केलेला गुन्हा नसून संपूर्ण समाजा विरूद्ध,संपूर्ण खेळा विरूद्ध केलेला गुन्हा आहे असे मला वाटते.जेव्हा प्रतिस्पर्धी मल्लाला चीत करून कुस्तीपटू भारतीय तिरंगा खांद्यावर घेतो तेव्हा आपण भारतीय असल्याचा खूप अभिमान वाटतो.ऑलिम्पिक मध्ये म्हणा कॉमनवेल्थ गेम्स मध्ये म्हणा किंवा एशियन गेम्स मध्ये म्हणा अथवा वर्ल्ड चॅम्पियनशिप मध्ये म्हणा एखाद्या भारतीय खेळाडूंनी देशासाठी तेथे खेळून मेडल मिळविल्यावर आपण त्या खेळाडूला आपल्या घरी राहूनच मोठ्या हर्षोल्लासामध्ये अंगा खांद्यावर घेऊन त्याचा आनंद जणू आपलाच म्हणून साजरा करीत असतो.त्यांना डोक्यावर घेऊन नाचत सुटत असतो.आज तेच खेळाडू गंभीर आरोप तेही डब्ल्यू.एफ.आय अध्यक्ष तथा खासदारांवर करीत असल्याने अशा संवेदनशील विषयावर फिर्यादी तथा आरोपी या दोन्ही पक्षांवर अन्याय न होता निष्पक्ष,पारदर्शक चौकशी करून व जोकोणी चुकीचा असेल त्याच्यावर कारवाई व्हायला हवी.भारताकडून खेळत बजरंग पुनिया,साक्षी मलिक यांनी ऑलिम्पिक पदक मिळविले असून विनेश फोगट हिने आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदकाची कमाई केलेली आहे.हे फक्त प्रातिनिधिक पदक विजेते व्यक्ती असून अशा अनेक क्रिडापटूंनी अनेक पदकांवर आपले नाव कोरुन देशाचा लौकिक वाढविलेला आहे.आपल्या कुस्तीपटूने देशात,सात समुद्रापार विदेशात भारताचा तिरंगा सन्मानाने फडकविलेला आहे.आजचे जंतरमंतर चे चित्र हे कुठल्याही सामाजीकरण झालेल्या व्यक्तीला अस्वस्थ करते.सदरच्या प्रकरणांमध्ये योग्य ती सखोल चौकशी होऊन सत्य बाहेर येणे ही आजची गरज असून उद्याच्या उज्वल भारतीय कुस्तीची सन्मानासहित परंपरा जपण्यासाठी,कुस्तीला वाढविण्यासाठी महत्वाचे आहे.माझ्यामते सदरचा आरोप खरा की खोटा हे तपास यंत्रणेच्या तपासामधून,समित्यांच्या शिफारशीवरून कळेलच पण,ही समस्या आजची नाही.या आधी सुध्दा वेगवेगळया खेळातील प्रशिक्षक व खेळातील नेत्यांवर लैंगिक शोषणाचा आरोप करण्यात आला होता.त्यावर नंतर काय झाले ? काही माहीती नाही.या समस्येने गंभीर रूप धारण करण्याआधी सत्य सामोर यायला हवे.वर्तमान काळातील कुस्तीपटूंच्या या आरोपावर ठोस कार्यवाही केली गेली नाही तर भविष्यामध्ये कुस्ती या खेळामध्ये पालक त्यांच्या मुलींना पाठविताना थोडा विचार जरूर करणार हे मात्र निश्चित आहे.आज लैंगिक शोषणाच्या आरोपावरून रणकंदन सुरू असतांना नेमकं कोण कोण या कुस्तीत चितपट होणार ? हे तुर्तास सांगणे कठीण आहे.सत्ताधारी पक्षाने हाताची घडी व तोंडावर बोटाच्या अवस्थेत राहू नये.जबाबदारी स्विकृत करून योग्य ती चौकशी तथा कार्यवाही करावी.राजकीय दृष्ट्या प्रेरित होऊन विरोधी राजकीय पक्षांनी व विरोधी विचारधारेच्या लोकांनी सुद्धा केवळ राजकारण हा मुद्दा डोळयासमोर ठेवून या प्रकरणात स्वतःची पोळी भाजण्याचा प्रयत्न करू नये.हा देशातील कुस्तीचा,अस्मितेचा संवेदनशील विषय असल्याचे लक्षात घ्यायला हवे.कुस्तीची लक्तरे,त्याचे नियम-नितीमत्ता ही राजकीय नेत्याकडून किंवा खेळाडूकडून वेशीवर टांगली जायला नको.भविष्यात कुस्ती अशा समस्यांना ग्रस्त असायला नको यासाठी नेता,कुस्तीपटू यासोबतच आपणही चौकस राहायला हवे.तथापी कुस्तीपटूंनी पुकारलेल्या आंदोलनाच्या वणव्यात वाईट गोष्टी जळून एक चांगली 'कुस्ती' तरुण-तरुणींच्या वाट्याला येईल काय ? हे येणारा काळच ठरवेल !.

**©ॲड.संदिप गुजरकर**
**यवतमाळ**

पोलीस बातमी पत्र
संमिश्र
मुंबई, मंगळवार ०९ ते १५ मे - २०२३


# दुबई ते मुंबई, सोन्याची पेस्ट करुन सुरू होती तस्करी; मुंबई विमानतळावरील कर्मचारीही होते सामील



मुंबई : मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरुन महसूल गुप्तचर संचालनालयाने (डीआरआय) सोन्याच्या तस्करीचा पर्दाफाश केला आहे. या तस्करीमध्ये काही प्रवासी आणि विमानतळावरील कर्मचारी यांचा समावेश होता. महसूल गुप्तचर संचालनालयाने तब्बल २.१ कोटी रुपयांचं ३.३ किलो सोनं विमानतळावरुन जप्त केलं असून याप्रकरणी ११ जणांना अटक केली आहे. रविवारी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर ही कारवाई करण्यात आली. मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर एका संशयित प्रवाशाला डीआरआय अधिकाऱ्यांनी अडवल्यानंतर हे प्रकरण समोर आलं. संशयित प्रवाशाकडून सोन्याच्या पेस्ट स्वरूपात ३.३ किलो सोनं जप्त करण्यात आलं. डीआरआय अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, भारतात सोन्याच्या तस्करीत सामिल असलेले प्रवासी बँकॉक ते दुबई असा प्रवास करत होते. भारतात उतरल्यानंतर ते सोनं मुंबई विमानतळावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांकडे पोहोचवत होते. विमानतळावरील कर्मचारीहे तस्करी केलेलं सोनं विमानतळ मेट्रोजवळ असलेल्या पेट्रोल पंपासह अनेक ठिकाणांवरुन बाहेरुन आत आणत होते. त्यानंतर ते या तस्करीत सामिल असलेल्या विमानतळ येथे काम करणाऱ्या दुसऱ्या व्यक्तीकडे पोहोचवत होते. दिल्लीहून मुंबईला येत असताना विमानतळावर एका संशियत व्यक्तीला डीआरआयने ताब्यात घेतलं. त्यानंतर संपूर्ण प्रकरण उघडकीस आलं. संशयिताची चौकशी करण्यता आल्यानंतर अधिकाऱ्यांनी तस्करीत सामिल असणाऱ्या सर्व लोकांची व्यवस्था सांभाळणाऱ्या, सोनं जमा करणाऱ्या आणि या सोन्याच्या तस्करीसाठी वित्तपुरवठा करणाऱ्या या तस्करीच्या साखळीतील अनेकांना ताब्यात घेतलं आहे. मिळालेल्या माहितीनुसार, भारतात सोन्याची तस्करी करण्यासाठी जवळपास २० प्रवासी दररोज बँकॉक ते दुबई प्रवास करत होते. या प्रवाशांना मागील दोन वर्षांपासून दररोज आळी-पाळीने दुबई-बँकॉकला पाठवण्यात येत होतं. त्यानंतर भारतात आल्यानंतर मुंबई विमानतळावरील कर्मचारी त्यांना पुढील कामासाठी मदत करत होते. विमानतळावरील कर्मचाऱ्यांना या तस्करीत सामील करत, या नवीन पद्धतीचा वापर करून दररोज मोठ्या प्रमाणात सोन्याच्या तस्करीत अनेक लोक सामिल असल्याचं डीआरआयच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं. या प्रकरणात आतापर्यंत ११ लोकांना ताब्यात घेण्यात आलं असून भारतात सोन्याच्या अशा बेकायदेशीर तस्करीचा पर्दाफाश करण्यासाठी पुढील तपास सुरू आहे.

# गुंतवणूकदारांना 2.77 कोटींचा गंडा, मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेकडून स्टॉक ब्रोकरला बेड्या

कॉन्कन्समार्ट शेअर्स अँण्ड स्टॉक ब्रोकर प्रायव्हेट लिमिटेडच्या संचालकाला अटक करण्यात आली आहे. उच्च परतावा देण्याचं आमिष दाखवून 52 गुंतवणूकदारांची (Investors) 2.77 कोटी रुपयांची फसवणूक (Fraud) केल्याप्रकरणी अटक केली आहे. मुंबई पोलिसांच्या (Mumbai Police) आर्थिक गुन्हे शाखेने (EOW) ही कारवाई केली. प्रशांत आंगणे असं आरोपीचं नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, "माहिम, डोंबिवली आणि भांडुपमध्ये कॉन्कन्समार्टची कार्यालये होती. आरोपीने या परिसरातील गुंतवणूकदारांना फसवण्याचा संशय पोलिसांना आहे.

30 ते 70 टक्के परतावा देण्याचं आश्वासन

काही जणांनी एक लाख रुपयांची गुंतवणूक करुन दहा वर्षा तएक कोटी रुपये कमावल्याचा दावा कंपनीने जाहिरातीमधून केला होता. सोबतच दहा हजार जणांना पॅम्पलेट वितरीत केले होते, असं एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितलं. तसंच या कंपनीने गुंतवणुकीवर 30 ते 70 टक्के परतावा देण्याचं आश्वासन दिलं होतं.

यू ट्यूबवर देखील भाषणं अपलोड

इतकंच नाही तर गुंतवणूकदारांचा विश्वास संपादन करण्यासाठी आरोपी भाषणं देत असत." अलिकडे त्यांनी अधिकाधिक गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी त्यांचं भाषण यू ट्यूबवर देखील अपलोड करण्यास सुरुवात केली होती, असं पोलीस तपासात समोर आलं आहे.

दुसऱ्या संचालकाच्या भूमिकेची पडताळणी

यासोबतच या कंपनीची दुसरी संचालक पल्लवी आंगणे हिच्या भूमिकेची पडताळणी केली जात आहे, असं पोलिसांनी सांगितलं. एप्रिल 2022 मध्ये नियामक तरतुदींचे पालन न केल्याबद्दल नॅशनल स्टॉक एक्सचेंजद्वारे (NSE) या फर्म ची हकालपट्टी करण्यात आली होती.

फसवणूक झालेल्यांची संख्या वाढण्याची शक्यता

दरम्यान सध्या 52 गुंतवणूकदारांनी पोलिसांशी संपर्क साधला असला तरी फसवणूक झालेल्यांची संख्या वाढण्याची शक्यता आहे, अशी माहिती एका पोलीस अधिकाऱ्याने दिली. विविध पोलीस स्टेशनमध्ये तक्रारी दाखल झाल्यामुळे आम्ही आमच्याकडे गुन्हा दाखल केला आहे. आम्ही गुंतवणूकदारांना आवाहन करत आहोत की, त्यांनी पुढे येऊन आरोपीविरुद्ध तक्रारी दाखल कराव्यात. आम्हाला खात्री आहे की रक्कम वाढेल, कारण 2,000 हून अधिक लोकांनी त्यांच्याकडे पैसे गुंतवले आहेत," असं पोलीस अधिकाऱ्याने पुढे सांगितलं.




'ओल्ड इज गोल्ड' योजना

अशोक कांबळे (वय 65 वर्षे) हे या प्रकरणातील प्रमुख तक्रारदार असून त्यांनी प्रथम भांडुप पोलिसांशी संपर्क साधला. कांबळे म्हणाले की, दहिजे नावाच्या एका मित्राने मला कॉन्कन्समार्टमध्ये गुंतवणूक करण्यासाठी प्रोत्साहित केलं कारण ही फर्म दरवर्षी 70 टक्के परतावा देते. दिहाजे यांनी कांबळे या कंपनीच्या 'ओल्ड इज गोल्ड' या योजनेबाबत संचालकांच्या यूट्यूबवरील काही लिंक्स दाखवल्या. त्यानंतर कांबळे यांनी फर्मच्या कार्यालयाला भेट दिली आणि इतर काही लोकांसह एका सेमिनारमध्ये भाग घेतला. यात आरोपी प्रशांत आंगणेने दावा केली की, त्यांना शेअर बाजारातील ट्रेडिंगचा चांगला अनुभव आहे. त्याने कोट्यवधी रुपये कमावल्याचा आणि आपल्या गुंतवणूकदारांना चांगला नफा दिला. सोबतच सेमिनारमध्ये सात योजनांबद्दल माहिती दिली. यानंतर कांबळे यांनी जून 2021 मध्ये त्यापैकी एका योजनेत 3.5 लाख रुपये गुंतवले आणि त्यांना 35 टक्के नफा देण्याचं आश्वासन देण्यात आलं. परंतु कंपनी अडचणीत असल्याचं सांगत कांबळे यांना कोणतेही रिटर्न न मिळाले नाही. मग आंगणेने फेब्रुवारी 2022 मध्ये गुंतवणूकदारांची बैठक बोलावली आणि सर्वांना त्याच्यावर विश्वास ठेवण्यास सांगितलं. परंतु त्यानंतरही पैसे न मिळाल्याने अशोक कांबळे यांनी यावर्षी जानेवारी महिन्यात भांडुप पोलिसात तक्रार दाखल केली. त्यानंतर आणखी तक्रारी आल्यानंतर हे प्रकरण मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आलं.

# चेंबरमध्ये उतरलेले कामगार पाण्यात बुडाले; दोघांचा मृत्यू तर इतर दोघांची प्रकृती चिंताजनक

छत्रपती संभाजीनगरमध्ये धक्कादायक प्रकार समोर आला असून, चेंबरचे काम करताना चार जण बुडाल्याची घटना समोर आली आहे. शहरातील सलीम अली सरोवर परिसरातील मलजल प्रक्रिया केंद्र येथे ही घटना घडली आहे. तर चेंबरमध्ये बुडालेल्या चौघांपैकी दोघांचा मृत्यू झाला असून, इतर दोघांची प्रकृती चिंताजनक आहे. त्यांच्यावर शासकीय घाटी रुग्णालयात उपचार करण्यात येत आहे. तर घटनेची महिती मिळताच मृतांच्या कुटुंबीयांनी घाटी परिसरात धाव घेतली. अंकुश बाबासाहेब थोरात (वय 32 वर्षे, हिमायत बेग भिमराज नगर), रावसाहेब सदाशिव घोरपडे (वय 33 वर्षे, रा. हिमायत बेग भिमराज नगर) असे मृत कामगारांचे नावं असून, विष्णू उगले (रा. हिमायतबाग) आणि बाळू विश्राम खरात यांची प्रकृती चिंताजनक आहे.



पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, चेंबरमध्ये बुडालेले चारही जण मोल मजुरीचं काम करायचे. पण गेल्या काही दिवसांपासून त्यांना काम मिळत नव्हते. अशात शहरातील मलजल प्रक्रिया केंद्र परिसरात असलेल्या चेंबरचे काम असल्याचे त्यांना कळाले होते. दरम्यान काम मिळाल्याने ते सर्वजण मलजल प्रक्रिया केंद्र परिसरात कामावर गेले. दरम्यान काम करता असतानाच यातील एक जण चेंबरमध्ये बुडाला असल्याचे त्याच्यासोबत असलेल्या इतर कामगारांच्या लक्षात आले. त्यामुळे त्याला वाचवण्यासाठी दुसरा आतमध्ये गेला, पण तो देखील आतमध्ये बुडाला. दोघेजण आतमध्ये बुडत असल्याचे पाहून आणखी दोघेजण त्यांना वाचवण्यासाठी आतमध्ये गेले, पण ते देखील पाण्यात बुडाले. डॉक्टरांनी दोघांना मृत घोषित केले एकामागून एक असे चारजण चेंबरच्या पाण्यात बुडाल्याचे इतर सहकाऱ्यांच्या लक्षात येताच त्यांनी अराडाओरड करून त्यांना बाहेर काढण्यात आलं. त्या चौघांना तात्काळ शासकीय घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्यांना तपासून त्यापैकी दोघांना मृत घोषित केले. तर इतर दोघांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांच्यावर उपचार करण्यात येत आहे. तसेच या याप्रकरणी शहरातील सिटी चौक पोलीस ठाण्यामध्ये अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. तर यातील मृत अंकुश थोरात यांना तीन मुलं आहेत. तर रावसाहेब घोरपडे यांना एक मुलगा आणि एक मुलगी आहे. तसेच उपचार सुरू असलेल्या विष्णू उगले यांना चार मुलं आणि बाळू खरात यांना दोन मुलं, एक मुगली आहे. नातेवाईकांची सिटी चौक पोलीस ठाण्यासमोर गर्दी चेंबरच्या पाण्यात काही कामगार बुडाले असल्याची माहिती मिळताच सिटी चौक पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. तसेच कामगारांना बाहेर काढण्यासाठी प्रयत्न केले. दरम्यान कामगारांच्या कुटुंबीयांना घटनेची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी शासकीय घाटी रुग्णालयामध्ये धाव घेतली. यावेळी हिमायत बाग येथील नागरिक आणि नातेवाईकांनीही घाटी रुग्णालयामध्ये धाव घेतली होती. दरम्यान काही नातेवाईकांनी सिटी चौक पोलीस ठाण्यासमोर गर्दी केली होती. मात्र पोलिसांनी त्यांची समजूत काढत, अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

# विरारमध्ये लग्नघरातच चोरांचा डाका, 25 तोळे सोन्यासह आहेराची पाकिटंही केली लंपास

विरार (Virar) पश्चिमेच्या अर्नाळा परिसरात लग्न घरात चोरी झाल्याची घटना घडली आहे. यात 25 तोळे सोन्यासह दीड लाखांची रोख रक्कम आणि आहेरात आलेली पाकिटंही चोरट्यांनी लंपास केली आहेत. अर्नाळा येथील तुरुकुली वाडीतील दामोदर निवासमध्ये राहणाऱ्या भोईर कुटुंबीयांच्या घरात चोरट्यांनी चोरी केली आहे. बुधवारी (4 मे) हा सर्व प्रकार घडला. या प्रसंगानंतर परिसरात एकच खळबळ पसरली. सोनं, पैसे, आहेराची पाकिटं यासह कपाटातील महत्त्वाची कागदपत्रं घेऊन चोरटे फरार झाले आहेत. याबाबत अर्नाळासागरी पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अर्नाळा (Arnala) पोलीस चोरट्यांचा शोध घेत आहेत. रुकुली वाडीतील दामोदर निवासमध्ये 3 मे रोजी आशा भोईर यांच्या लहान मुलीचं लग्न पार पडलं. दुसऱ्या दिवशी 4 मे रोजी संपूर्ण कुटूंब आणि परिवार विरार पश्चिमेच्या अर्नाळा येथील सोसायटी बस स्टॉप येथे मुलाच्या घरी गेले होते. याचाच




फायदा घेत घरी कुणी नसल्याचं पाहून अज्ञात चोरट्यांनी 4 मे रोजी रात्री 8:30 ते 10 च्या दरम्यान घराच्या बाहेरील भिंतीवर चढून घरात प्रवेश केला. चोरट्यांनी घरातील कपाट उघडून सर्व सोन्याचे दागिने, रोख रक्कम, लग्नात आलेली बंद पाकिटं आणि महत्वाचे कागदपत्रे घेतले आणि घरी कोणी यायच्या आधीच चोर फरार झाले.

लग्न घरात चोरी झाल्याने संपूर्ण परिसरात दहशद निर्माण झाली आहे. या सर्व प्रकारानंतर भोईर कुटुंबावर मोठ संकट आलं आहे. आधीच लग्नाचा खर्च आणि त्यानंतर दागिने आणि पैशांची चोरी झाल्याने भोईर कुटुंबापुढे मोठा प्रश्न उभा राहिला आहे. पोलीस काही मार्ग काढू शकतील का, याकडे भोईर कुटुंबाच्या नजरा आहेत.

मुंबईतही काही दिवसांपूर्वी घडला होता असाच प्रकार

मुंबईतील गावदेवी परिसरातील एका घरातून तब्बल 1.98 कोटी रुपयांच्या दागिन्यांची चोरी झाली होती. चोरी झालेल्या दागिन्यांपैकी 1.71 कोटी रुपयांचे दागिने गावदेवी पोलिसांनी परत मिळवले होते. या चोरीमध्ये अनेक वर्षे घरात काम करणाऱ्या मोलकरणीचा समावेश होता. घरातील मोलकरणीला बेड्या आणि चोरी उघड चोरीचा गुन्हा दाखल झाल्यानंतर गावदेवी पोलिसांनी या प्रकरणाची चौकशी सुरु करुन तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपीचा शोध घेण्यास सुरुवात केली.

# माज्याकडे साडेबारा कोटींचा बंगला, नोकरीची गरज नाही; कार्यालयात घुसून बोगस डॉक्टराची आरोग्य अधिका-याला धमकी




खोट्या कागदपत्रांच्या आधारे कंत्राटी वैद्यकीय अधिकारी पदावर कार्यरत असणाऱ्या एका बोगस डॉक्टरावर (Bogus Doctor) काही दिवसांपूर्वी आरोग्य विभागाने (Health Department) कारवाई करत निलंबित केले होते. मात्र निलंबित करण्यात आलेल्या या बोगस डॉक्टराने चक्क उपसंचालक आरोग्य सेवा कार्यालयात घुसून जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर शेळके यांना दमदाटी केल्याचं धक्कादायक प्रकार समोर आला आहे. धक्कादायक म्हणजे, जीवे मारण्याची धमकी देऊन कार्यालयातील कागदपत्रे फेकून दिली. या प्रकरणी आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर शेळके यांनी बोगस डॉक्टरविरोधात वेदांतनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. तर माझ्याकडे साडेबारा कोटींचा बंगला असून, मला नोकरीची गरज नाही असे म्हणत धमकी दिल्याचा देखील तक्रारीत उल्लेख करण्यात आला आहे. मोहसीन खान असे या बोगस डॉक्टराचे नाव आहे. शेळके यांनी पोलिसात दिलेल्या तक्रारीनुसार, चार जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची 3 मे रोजी डॉ. एकनाथ माले यांच्या अध्यक्षतेखाली आरोग्य सेवा या इमारतीत बैठक सुरू होती. दरम्यान त्यावेळी खोट्या कागदपत्रांच्या आधारे नोकरी मिळविल्याच्या आरोपात निलंबित करण्यात आलेला मोहसीन खान हा तिथे आला. त्याने माहितीच्या अधिकारात कंत्राटाविषयी माहिती मागितली होती. मला कोर्टात सदर कागदपत्रांची गरज आहे. तू माहिती दिली नाही तर तुला पाहून घेईन, अशी धमकी मोहसीन खान याने डॉ. शेळके यांना दिली. तर ही घटना घडल्यानंतर काही वेळाने मोहसीन खान तेथे परत आला. त्याने डॉ. शेळके यांना शिवीगाळ केली. तसेच 38 हजारांच्या नोकरीला मी लाथ मारतो, असे म्हणत शेळके यांच्या टेबलावरील महत्त्वाची कागदपत्रे, फायली फेकून देऊन सरकारी कामात अडथळा आणला. तसेच माझ्याकडे साडेबारा कोटींचा बंगला आहे, जॅग्वार कार आहे, मला नोकरीची गरज नाही, असे सांगितल्याची माहितीही तक्रारीत देण्यात आली आहे. पोलीस संरक्षण देण्याची मागणी... सेवेतून बडतर्फ करण्यात आलेल्या या बोगस डॉक्टरने जीवे मारण्याची धमकी दिली असून, तो वारंवार 'तुझे खतम करूंगा' असे धमकावत आहे. त्यामुळे आपणास पोलीस संरक्षण द्यावे, अशी मागणी जि.प.चे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर शेळके यांनी वेदांतनगर ठाण्याच्या निरीक्षकांकडे केली आहे. बनावट कागदपत्रांच्या आधारे मोहसीन खान याने कंत्राटी वैद्यकीय अधिकारी पदाची नोकरी मिळवली. तो सिल्लोड तालुक्यातील अंधारी प्राथमिक आरोग्य केंद्रात रुजू झाला होता. त्याच्या पदवीबाबत शंका आल्यामुळे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. शेळके यांनी भारतीय चिकित्सा पद्धती राष्ट्रीय आयोग, तसेच महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन यांच्याकडे नोंदणीकृत वैद्यतेची तपासणी केली.

# धक्कादायक ! डोक्यात संशयाचं भूत घुसला, म्हणून कु-हाडीने वार करून थेट पत्नीचा जीवच घेतला

जालन्यातील अंबड तालुक्यातील शहागडमध्ये एक धक्कादायक प्रकार समोर आला असून, चारित्र्यावर संशय घेऊन पतीनेच पत्नीच्या डोक्यात कुऱ्हाडीने वार करून खून (Murder) केल्याची घटना उघडकीस आली आहे. शुक्रवारी सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास ही घटना घडली असून, ज्योती दिलीप भारस्कर (वय 36 वर्षे रा. कोठाळा खु. ता. अंबड, ह.मु. डोंगरे वस्ती पैठण रोड शहागड) असे मयत महिलेचे नाव आहे. तर पत्नीची हत्या




केल्यावर घटनास्थळावरून संशयित आरोपी दिलीप गणपत भारस्कर हा फरार झाला आहे. त्यामुळे पोलिसांकडून त्याचा शोध घेतला जात आहे. दरम्यान, या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. पोलिसांकडून मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, मयत महिला ज्योती भारस्कर आणि दिलीप भारस्कर यांच्या विवाहाला 14 वर्षे झाली आहेत. लग्न झाल्यावर सुरुवातीला त्यांचा संसार चांगला चालला. दरम्यान, त्यांना तीन अपत्य झाली. मात्र, काही वर्षांपासून दिलीप भारस्कर हा ज्योती भारस्कर यांच्या चारित्र्यावर संशय घेत होता. त्यामुळे यावरून त्यांच्यात वाद देखील होत असे, तर सोबतच कौटुंबिक वादही सुरू होता. काही दिवसांपासून दिलीप भारस्कर हा ज्योती भारस्कर हे शहागड येथील डोंगरे वस्तीवरील वीटभट्टी येथे काम करीत होते. तर शुक्रवारी सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास ज्योती भारस्कर आणि दिलीप भारस्कर या दोघांमध्ये पुन्हा वाद झाला. वाद एवढ्या विकोपाला गेला की, दिलीप भारस्कर याने रागाच्या भरात थेट ज्योती भारस्कर यांच्या डोक्यात कुऱ्हाडीने वार केले. त्यामुळे ज्योती या गंभीर जखमी झाल्या आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला.

# ऑनलाईन गेममध्ये गमावले पैसे, अभियांत्रिकीचे शिक्षण घेतलेल्या तरुणाची तलावात आत्महत्या

छत्रपती संभाजीनगरमध्ये (Chhatrapati Sambhaji Nagar) एक धक्कादायक घटना समोर आली आहे. ऑनलाईन गेममध्ये पैसे गमवल्याने चिंतेत असलेल्या अभियांत्रिकीचे शिक्षण घेतलेल्या तरुणाने हर्सूल तलावात उडी घेऊन आत्महत्या (Suicide) केली आहे. या प्रकरणी हर्सल पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. तर गौरव चंद्रकांत पवार (वय 23 वर्षे, रा. पवननगर, टीव्ही सेंटर) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. पोलिसांकडून मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, गौरव पवारला ऑनलाईन गेम खेळण्याची सवय जडली होती. त्यात त्याने जवळपास 50 हजार रुपये गमावल्याची नातेवाईकांमध्ये चर्चा होती. हा प्रकार समजल्यावर गमावलेले पैसे भरण्यासाठी गौरवला त्याच्या मामाने त्याला 40 हजार रुपये दिले होते. मात्र तरीही तो नेहमी तणावातच होता. दरम्यान, शुक्रवारी सकाळी घरी वडिलांसोबत त्याने जेवण केले. आई-वडील कामानिमित्त बीडला गेले. तर घरात एकटाच असल्यामुळे गौरव दुपारच्या वेळी हर्सूल तलाव परिसरात आला. बऱ्याच वेळ तो तलावाच्या काठावर बसून होता. मात्र काही वेळाने त्याने तलावात उडी घेतली.

# भिवंडीतील 'सपना' बारवर पोलिसांचा छापा; 10 बारबालांसह 13 जणांवर गुन्हा दाखल

भिवंडीत लाईव्ह ऑर्केस्टाच्या नावाखाली सुरू असलेल्या सपना बारवर नारपोली पोलिसांनी छापा टाकला. या बारमध्ये ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी तोकड्या कपडयावर काही बारबाला ग्राहकांसोबत अश्लील हावभाव करत असताना पोलिसांना आढळून आले. या छापेमारीत पोलिसांनी 10 बारबालांसह हॉटेल मॅनेजर, वेटर अशा 13 जणांना ताब्यात घेतले. नारपोली पोलीस ठाण्यात त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करून घेण्यात आला आहे. 'जादू है नशा है' गाण्यावर पोलिसांची एंट्री भिवंडी




तालुक्यातील दापोडे रोडजवळ असलेल्या सपना लेडीज बारमध्ये ऑर्केस्ट्राच्या नावाखाली तोकडे कपडे घालून आणि अश्लील हावभाव करत बारबाला ग्राहकांना आकर्षित करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारावर नारपोली पोलिसांनी 4 एप्रिल रोजी रात्री साडेअकराच्या दरम्यान बारवर छापा टाकला. त्यावेळी, बारमध्ये बसलेल्या ग्राहकांसमोर तोकड्या कपडयांमधील बारबाला 'जादू है नशा है, मदहोशिया है' या हिंदी गाण्यावर अश्लील हावभाव करत असल्याचे आढळून आले.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत). संपर्क:-9594418181 / 8424989898